## डॉ. नितीन मोरे

# चक्रमादित्याचा दरबार 4





# चक्रमादित्याचा दरबार - ४

## (नाटक)

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# चक्रमादित्याचा दरबार - ४

# हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

## पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

## पण

# तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

## आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा. सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# चक्रमादित्याचा दरबार - ४


लेखक:- **डॉ. नितीन मोरे,**

श्वसनरोग तज्ञ

वसई, जि, पालघर.

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

**This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.**

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान -:

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन :- ९ सप्टेंबर २०२२ (अनंतचतुर्दशी)

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली. सामान्यत:- आजूबाजूच्या दैनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे एकोणचाळीसावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo.com

# चक्रमादित्याचा दरबार - ४

## डॉ.नितीन मोरे

# चक्रमादित्याचा दरबार - ४

## प्रास्ताविक

महाराज स्मार्ट झाले.. अतिस्मार्ट झाले.. इव्हाॅल्व झाले म्हणाना. इतके की देवत्वाजवळ जाऊन पोहोचले. चक्रमपुरीत महाराजांना 'नियर गाॅड'पणा मिळालाय. त्यामुळे देवादिकांसारखे महाराजांचे सोपस्कार करणे आले.

आकाशस्थ देवासारखे महाराज सर्व शक्तिमान झाले. त्यांच्या कृपादृष्टीने उद्धार नि अवकृपेने रसातळ. देवाचा कोप होतो तसा महाराजांचा न होवो म्हणून सश्रद्ध चक्रमपुरकर झटू लागलेत. रोज दरबाराची सुरूवातच त्यामुळे महाराजांच्या आरतीने होते. महाराज ही आपली ताकद जाणून असले तरी त्यांना लोकाभिमुखता आवडते. म्हणजे जनमनाशी संपर्क हवाच. तो महाराज ठेवतातच..

दरबार बदलतोय.. पण महाराज आणि प्रधानजींचाच संवाद कायम आहे. अजूनही तिथे तिसरा कोणी बोलत नाही..

चक्रमादित्याच्या दरबाराचा हा भाग ४.

चंद्राप्रमाणे कलाकलाने विकसित होणाऱ्या राजाचा हा दरबार. बाकी भागांप्रमाणेच सारे काही काल्पनिक. कशाशी कुठेही काहीही साधर्म्य आढळल्यास तो अर्थातच पूर्णपणे योगायोग समजावा. बाकी वाचकांनी कल्पनाशक्ती कशी वापरावी ह्यावर लेखकाचे नियंत्रण ते काय असणार?

डॉ.नितीन मोरे

# १

महाराज चक्रमादित्य दरबारात येतात. सुटाबुटात, अगदी मा ॅडर्न पेहरावात. हातात गुलाबाचे ई फूल. त्याला खाली बटण आहे, ते दाबले की सुगंधी फवारा बाहेत पडतो. ते ई फूल नाकाने हुंगत तरातरा आत येतात.

दरबारी:

महाराजांचा विजय असो.. (आरतीच्या सुरात)

जय जय जय जय जयजी महाराज
बाकी सारे बिनकामाचे, शिरावर तुमच्या ताज..

अखंड करूया चला महाराज नाम जप
खूश होती महाराज इतरां बसविती गप
जय जय..

अखंड देशामध्ये तुम्ही फक्त केपेबल
आरती ओवाळू भावार्ती ओवाळू इन हंड्रेड डेसिबल
जय जय..

जे जे बघती म्हणती एक तुस्सी ग्रेट
इतर सारे निक्कमे, तुम्हा न कोणाची थ्रेट..
जय जय..

राजाधिराज चक्रमादित्य महाराजांचा विजय असो..

त्रि ते त्रिशतवार विजय असो..

महाराज : वा! प्रधांजी, धन्य. धन्य झालो आम्ही, त्या जुन्यापुराण्या घोषणा गेल्या..

प्रधानजी : होय महाराज..

महाराज : नवीन घोषण आल्या..

प्रधानजी : होय महाराज..

महाराज : अत्यंत प्रगतिशील आम्ही..

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : प्रधांजी..

प्रधानजी : होय महाराज..

महाराज : आपले भाट चरणदास कवी याची काय खबरबात?

प्रधानजी : होय महाराज. आहे महाराज. कालकोठडीत. आजकाल त्यास विशेष शब्द सुचत नाहीत. प्रतिभेचा झरा आटला म्हणतो. आम्ही ना ना प्रकारे प्रयत्न केले. महाराज स्तुती लिहिण्यास डोक्यावर बंदूक रोखली. पण चरणदासाची नजर चरणाकडेच. काही सुचत नाही म्हणावयास पण बोलेल तो..

महाराज : पुरे प्रधांजी. आम्ही ही आरती ऐकून धन्य जाहलो. आमचे हे कर्णद्वय धन्य जाहले. तृप्त जाहले. अशा दिव्य लेखक-कवींची पैदास या भूमीत होऊ लागली आहे..

प्रधानजी : होय महाराज.. आपला आदेशच तसा महाराज..

महाराज : प्रधांजी, त्यामुळे आता चरणदासाचे काय काम?

प्रधानजी : होय महाराज..

महाराज : खायला काळ भुईला भार.. अनुत्पादक बाबींचा आम्हास तिटकारा आहे प्रधांजी..

प्रधानजी : होय महाराज.. आम्ही जनतेत तसा प्रचार केला आहे महाराज.. त्याव्यतिरिक्त महाराजांच्या अन्य कथा ही कानोकानी लोकच पसरवत आहेत..

महाराज : प्रधांजी, तुम्ही आहातच कर्तव्यनिष्ठ.. आता त्या भाकड चरणदास कैद्याचे सरकारी पैशातून लाड पुरवणे पुरे..

प्रधानजी : होय महाराज..

महाराज : जनतेचा पैसा असा उधळणे पुरे..

प्रधानजी : होय महाराज..

महाराज : तेव्हा कमीतकमी खर्चात चरणदासास परमेश्वराघरी पाठवावे. आमचा आदेश आहे.

प्रधानजी : होय महाराज..

महाराज : त्वरित अंमलबजावणी व्हावी प्रधांजी..

प्रधानजी : होय महाराज. जो हुकूम महाराज.. त्व, ता, ता..

महाराज : म्हणजे काय प्रधांजी?

प्रधानजी : क्षमा असावी महाराज.. आम्हाला वाटले विलंब क्षणाचाही नसावा म्हणून आम्ही थोडक्यात आदेशलो..

महाराज : आदेशलो? हे नवीन क्रियापद प्रधांजी?

प्रधानजी : होय महाराज. भाषा सुधार समितीने सुचवले महाराज.. तर त्व ता ता म्हणजे त्वरीत, तात्काळ, तातडीने..

महाराज : छान! अत्यंत छान आणि आमच्या राज्यकारभारासारखाच अत्यंत जलद उच्चारता येण्यासारखा.. त्व ता ता..

प्रधानजी : होय महाराज..

( टाळी वाजवत )

कोण आहे रे तिकडे..

शिपाई आत येतो

प्रधानजी : शिपाई.. चरणदास कवीस त्व ता ता हत्तीच्या पायी द्या. महाराजांचा आदेश.. हुकूम आहे.

शिपाई वाकून मुजरा करून निघून जातो.

महाराज : आपली ही राज्यपद्धती आम्हास फार आवडते..

प्रधानजी : होय महाराज..

महाराज : चट निर्णय.. पट अंमलबजावणी..

प्रधानजी : होय महाराज.. आम्ही आपल्या या कार्यक्षमतेचे गुणगान गाणारे साहित्य प्रसवू घातले आहे महाराज. साहित्य सुधार समिती यात लक्ष घालत आहे महाराज. जनतेस आपल्या 'चक्रमादित्य निमिषार्धात निर्णय' या योजनेची साद्यंत माहिती पुरवली जाईल याची व्यवस्था केली आहे महाराज.. आणि शंभर निरपराध फासावर गेले तरी चालतील पण एकही अपराधी सुटू नये या आपल्या धोरणास आलेली फळे, त्यामुळे गुन्हेगारी कमी झाली आहे महाराज. गुन्हेगारी रोखावयाची तर अशाच धडक योजनांचा धडाका महाराजांनी लावला त्याबद्दल जनतेत खूपच चर्चा आहे महाराज..

महाराज : चर्चा? चर्चा प्रधांजी?

प्रधानजी : आम्हाला कळले महाराज.. टीका नव्हे.. आपल्या निर्णयक्षमतेबद्दल कौतुकादराची चर्चा महाराज. आणखीन एक सांगावयाचे आहे महाराज..

महाराज : आज्ञा आहे प्रधांजी..

प्रधानजी : जी महाराज. मंत्रीगणांस नि त्यामुळे सामान्य जनतेसही आपल्याला जनतेच्या मताबद्दल इतकी कदर असण्याचे कौतुक आहे महाराज. जनतेत आपल्याबद्दल फक्त चांगलेच मत असावे असा आदेशच आपल्या आदेशानुसार आम्ही काढला आहे. त्यामुळे सारे काही आपल्याला हवे तसेच होत आहे महाराज. जनतेला आपल्यावर गर्व आहे महाराज. आणि

कित्येक जनांस स्वर्गात इंद्रदेव आणि धरतीवर आपण त्याचे नरावतार आहात याची खात्री आहे.

महाराज : अजून काही गुणगान प्रधांजी?

प्रधानजी : होय महाराज.. आपल्यासम न कोणी या भूतलावर झाला न होईल असे जनतेपैकी बहुसंख्यांचे मत आहे..

महाराज : खामोश!

प्रधानजी : गुस्ताखी माफ असावी महाराज.. पण प्रमाद कळेल का?

महाराज : प्रमाद? आम्ही हे काय ऐकत आहोत? बहुसंख्य? प्रधांजी याचा अर्थ काही डोकी अजूनही आमच्या दिव्यत्वाबद्दल साशंक आहेत? तुमच्या डिपार्टमेंटमध्ये इतकी हलगर्जी? आमच्या देवत्वाबद्दल आम्ही स्वत: बोलत नाही कारण ते आम्ही किती विनयशील आहोत हे दाखवण्यास मारक ठरते. पण तसे बंधन तुमच्यावर नाही. तुमच्या हाताखालील अधिकारी वर्ग बदला. ज्यांना ज्यांना योग्य वाटेल त्यांना त्यांना तुम्हाला हवी ती शिक्षा द्या. कोणी कामचुकार किंवा स्वत:ची बुद्धी वापरणारा असेल तर त्यास आपल्या पद्धतीने सरळ करा वा सरळ तुरुंगाचा रस्ता दाखवा. त्यासाठी हव्या त्या क्लृप्त्या वापरा. त्या काय ते आम्ही तुम्हास सांगावे असे नाही. आपले गुप्तहेरखाते सक्षम आहे. सैन्यबळ ही आहे. त्याचा वापर करा.. आरोपांची आणि पुराव्यांची चिंता करू नका. अशी माणसे कोठडीत काही वर्षे राहिल्याने देशाचे भलेच होईल.

प्रधानजी : होय महाराज..

महाराज : आणि प्रधानजी..

प्रधानजी : हुकूम महाराज..

महाराज : इतकेच नव्हे, तुरूंगात पोसून जनतेच्या धनाचा अपव्यय टाळण्यासाठी अशांना परलोक प्रवासास धाडा.

प्रधानजी : होय महाराज.

महाराज : आणि प्रधांजी आपल्या वैज्ञानिकांस दिवसरात्र कामास लावा. त्यासाठी हवे तर बळाचा वापर करा. जनतेत हा संदेश जाऊ द्या की वैज्ञानिक प्रगतीसाठी आम्ही स्वत: आग्रही आहोत. अर्थात मानवी मेंदूत येणाऱ्या विचारांवर लक्ष ठेवणारे तंत्रज्ञान शोधून काढण्यासाठी विज्ञानाचा वापर करावा ही देशाच्या सुरक्षितते संबंधातील गोपनीय बाब आहे हे ध्यानात ठेवा. ती अति गोपनीय असल्याने फक्त वैज्ञानिक प्रगतीसाठी आम्ही आग्रही आहोत नि पुरोगामी विचारांचे आहोत हे जनतेच्या मनावर बिंबवा. आम्ही तुम्हास हे सांगावे असे नाही.

प्रधानजी : होय महाराज. आणि माफी असावी महाराज. आपल्या आदेशाप्रमाणे नि हुकुमानुसारच सारे काही होईल. आपल्या प्रदेशातील तीन ठिकाणी महाराज चक्रमादित्य मंदिरे उभारली गेली आहेत नि तेथे भक्तगणांची रीघ लागली असते. तरीही मनुष्यप्राण्यांत काही वेगळाच विचार करणारे असतात. स्वत:स शहाणे समजणारे हे दीड शहाणे शंभरात चार वा पाच. पण आपली मते मांडून समाजमन कलुषित करतात. त्यांस बहुमत मंजूर नसते नि इतरांच्या मताविरूद्ध काही मत मांडणे हीच त्यांच्या जीवनाची

सार्थकता. असे काही लोक राज्यात अजूनही आहेत, स्वत:स विचारवंत म्हणवत ते लोकांना बहकवण्याची कृत्ये करत असतात. अर्थात आता सर्वसामान्य जनता शहाणी झाली आहे, त्या ढुढ्ढाचार्यांचा तोंडावर बेधडक अपमान करून त्यांची तोंडे ती परस्पर बंद करीत असते. कधी कधी तर ती अशांच्या अंगावर धावून जाते. मागील महिन्यात अशांपैकी एक जनरोषास बळी पडून त्यास स्वर्गवास पत्करावा लागला.. तसे म्हणावयाची पद्धत आहे म्हणून, नाहीतर खरेतर नरकवास असणार. तरीही स्वत:स स्वयंभू समाजसुधारक म्हणवणारे काही आहेतच. पण जनता जागरूक असल्याने अशांची फार चिंता करण्याची गरज नसावी महाराज. तरीही आपल्या आदेशाचे पालन तंतोतंत होईल महाराज. ही स्वत:स विचारी म्हणवणारी विषवल्ली मुळापासून उखडून टाकण्याचे आदेश आम्ही देऊच.

महाराज : प्रधांजी.. आम्ही नुसता विचार करून शिणलो आहोत.. आमच्या देशाबद्दल विचार करतो.. देश म्हणजे आम्ही आणि आम्ही म्हणजेच देश.. रात्रंदिवस हाच विचार. याच्या विरोधात आमच्याच देशाचे कुणी.. आम्ही समजू शकत नाही, असे देशद्रोही आमच्या राज्यात अजूनही आहेत.. प्रधांजी, वैज्ञानिकांस रात्रंदिवस कामाला लावा.. असे विचार करणाऱ्या मेंदूंना शोधण्याचे तंत्र शोधा.. दरबाराची सुरूवात इतकी उत्साहात झाली.. आम्ही विचाराने शिणलो आहोत..

प्रधानजी : होय महाराज..

महाराज : शाबास प्रधांजी. आम्हास असे होय महाराज म्हणणारेच पसंत आहेत. दिनरात आम्ही आमचाच म्हणजे देशाचाच विचार करतो. दिवसाचे अठरा तास कामात असतो.. आणि आम्हास आमच्या देशकेंद्रित विचारांस साथ देणारेच आवडतात.. आपली 'होय महाराज' म्हणणाऱ्या अधिकाऱ्यांची फौज अजून सक्रिय करा..

प्रधानजी : होय महाराज.. त्यांचे ट्रेनिंग अखंड सुरू आहे महाराज.

महाराज : आम्हाला आमचाच याबद्दल अभिमान वाटतो. पण तरीही आता आम्हाला अधिकाधिक विचार करण्याची गरज आहे.. तेव्हा दरबार बरखास्त..

प्रधानजी : हुकूम महाराज..

दरबारी : महाराजांचा विजय असो..!

२.

महाराज आज नव्या सुटाबुटात आहेत. हातात तेच गुलाबाचे ई फूल. बटण दाबून फवाऱ्यासारखे सुगंध उधळणारे. महाराज हलकेच वास घेतात. मग दीर्घ श्वास घेतात. पायातल्या बुटांकडे लक्ष जाते.. एक शिपाई धावत येतो. बुटांवर चक चक आवाज करीत फडके फिरवतो.. महाराज त्या वाकलेल्या शिपायाला एखाद्या साधूप्रमाणे आशीर्वाद देतात. मग पुढे येतात.

दरबारी : राजाधिराज चक्रमादित्य महाराजांचा विजय असो.

आरती सुरू करतात

जय देव जय देव चक्रमादित्य देवा
शरण आलो तुजला नाहीतर वाटतसे भेवा

कर कटावरी घेऊन ठाकित उभे तुम्ही
कर्तृत्वे अचंबित बोटे तोंडी घालावी आम्ही
जय देव..

तुमच्या शक्तीचा महिमा वर्णावा अम्ही किती
तुमच्या युक्तीला अमुच्या भक्तीला नाही ती मिती
जय देव..

येई किंवा जाई तुमच्या वाकडा कुणी वाटेवरी
तुम्ही उभे त्यासाठी हात ठेऊनी कटिवरी
जय देव..

भावभक्तीने कोणी न येई तुज शरण
लायनीवर शेवटी येऊन पकडे तो चरण
जय देव..

चक्रमादित्य महाराजांचा त्रि सहस्त्रवार विजय असो..

महाराज : वा! तृप्त कानाने आम्ही दरबार सुरू करतो. कान भरून आरती ऐकली की मान.. नव्हे मन ही भरून येते.. वा! आरती लेखकांस खास मान आणि धन द्या प्रधांजी..

प्रधानजी : होय महाराज. आपल्या 'चक्रमादित्य राष्ट्र भावना लेखक कवी निर्माण योजने'अंतर्गत तयार होणाऱ्या कवींची निर्मिती आहे महाराज. त्यांना दररोज कमीत कमी एक आरती, महिन्यात एक चक्रमादित्य चालिसा, सहा महिन्यात एक चक्रमादित्य स्तोत्र आणि दैनंदिन चक्रमादित्य महिमा लिहावयास सांगितले आहे. एक महाकाव्य लिहिणे ही सुरू आहे. त्यांना भरघोस बक्षिसे आपल्या सांगण्यानुसार देण्याची तजवीज करतो महाराज..

महाराज : त्व ता ता करावी..

प्रधानजी : होय महाराज. आपले सारे काही त्व ता ता.. त्याप्रमाणे आम्ही हुकूमनामा काढतो महाराज.. त्व ता ता

महाराज : बाकी राज्याची काय हालहवाल?

प्रधानजी : आपण असताना उत्तमच असायची महाराज. तसे आदेशच आहेत आपले महाराज. तेव्हा कुणी दु:खी होण्याची कोणाची काय बिशाद महाराज..

महाराज : त्या दिवशीच्या प्रकारानंतर आम्ही विचार केला. खूप विचार केला. त्यावर ..

प्रधानजी : माफी असावी महाराज, आपल्या 'राष्ट्र निर्माण समिती'ने यावर एक राष्ट्रव्यापी स्पर्धा घेण्याचे योजिले आहे.. अर्थात आपल्या परवानगीने महाराज..

महाराज : स्पर्धा? ती ही राष्ट्रव्यापी? अखंड चक्रमपुर देशात एकच स्पर्धा .. याहून एकता ती वेगळी काय असायची? बोलावे प्रधांजी.. आम्ही आतुर आहोत..

प्रधानजी : होय महाराज.. 'कपिवर स्पर्धा' असे त्या स्पर्धेचे नाव असून त्यात सर्वोत्तम कपिचा शोध घेतला जाईल.

महाराज : कपि? आपल्या राज्यातील माकडांसाठी स्पर्धा?

प्रधानजी : होय महाराज.. म्हणजे क्षमा असावी महाराज. स्पर्धा नागरिकांसाठीच असेल महाराज. ती तीन माकडांवर आधारित असेल..

महाराज : जरा विस्कटून सांगावे प्रधांजी..

प्रधानजी : होय महाराज. काही नागरिकामध्ये उगाच आपले मत व्यक्त करण्याची एक खुमखुमी दिसते. विशेषत: कुठे काही वावगे वाटले तर. असे नागरिक कमी आहेत पण त्यांच्यामुळेच महाराजांस मनस्ताप झाला हे ध्यानात घेऊन हे आयोजन होईल. यात दर दिवशी एक याप्रमाणे एक खरी पण वाईट बातमी पसरवली जाईल.. ती न वाचणारा, न ऐकणारा किंवा ऐकून वाचून त्यावर काहीच प्रतिक्रिया न देणारा अशा तीन सर्वोत्तम नागरिकांची निवड दररोज करण्यात येईल. खरी बातमी असूनही तिच्याबद्दल काही न बोलणाऱ्या, लिहिणाऱ्या, आणि ती न वाचणाऱ्या वा ऐकणाऱ्यांस 'कपिवर' असा किताब देण्यात येईल. त्यामुळे वाईट बातमीकडे दुर्लक्षिणाऱ्यांची संख्या वाढत जाईल. त्याच बरोबर ही बातमी राज्याशी संबंधित असून आणि ती दुवार्ता असूनही निव्वळ महाराजांवर विश्वास

असल्याने तिच्याकडे लक्ष न देणारा सुजाण राष्ट्रप्रेमी नागरिक घडवता येईल. असे पुरस्कार दररोज दिल्याने त्यासंबंधी लोकांची उत्सुकता ताणली जाईल. राज्यातील बेरोजगारांस यात मनोरंजनाची संधी ही उपलब्ध होईल. निव्वळ रिकाम्या हातासच नव्हे तर रिकाम्या मनांसही काही वावगा विचार न करण्यास उद्युक्त करता येईल..

महाराज : अत्यंत हुशारीने आखलेली योजना आहे ही. आम्ही प्रसन्न आहोत. आमच्या लेखक आणि कवि निर्मिती समिती, भाषा सुधार समिती, पुराण पुनरूज्जीवन समिती अशा वेगवेगळया समित्या जोराने नि जोशाने कामास लागल्या आहेत. आम्हाला आमचाच अभिमान वाटतो.

प्रधानजी : होय महाराज..

महाराज : पण प्रधांजी, या स्पर्धेत स्पर्धकांवर म्हणजे जनतेवर लक्ष कोण कसे ठेवणार?

प्रधानजी : होय महाराज. त्यासाठी समितीने विचार केला आहे महाराज. जनतेतीलच जनता म्हणजे लोकच एक दुसऱ्यावर लक्ष ठेऊन असतील महाराज. जो नियम मोडेल त्याची तक्रार त्व ता ता करता येईल. त्यासाठीही खास प्रोत्साहनपर इनाम ही देण्याचे ठरले आहे नि त्यामुळे लोकांपैकी जे नासके किडके डोकेबाज आहेत त्यांच्यावर खास लक्ष ठेवता येईल.. जनताच आपले काम सोपे करील महाराज.

महाराज : वा! प्रधांजी वा! अत्यंत हुशारीने आखलेली योजना. आम्ही खूश आहोत. जनता हीच आमची खरी पाठीराखी. तिला आपल्या बाजूस फिरवले की

आम्हास काय कोणाची भीती! वा! यास म्हणतात जनतेचा कैवारी! जसे आम्ही आहोत. एक एक नागरिक एक एक सैनिक जणू. अज्ञांच्या विचारांवर पहारा ठेवणारा. सुज्ञ पहारेकरी जणू. बुरा मत बोलो.. बुरा मत सुनो.. बुरा मत देखो.. वा! आमच्या विरोधात. आमच्या म्हणजे देशाच्या विरोधात.. कुणी कधी कसा विचार करू धजेल? आमचे ध्येय एकच. देशोन्नती. प्रगती. त्यासाठी हवी जनतेची साथ. आम्ही खरे जनतेचे कैवारी. त्यातील जनता अशी तन मन धन आम्हास अर्पण करेल.. तर देशोन्नतीस तो वेळ किती लागणार? सोन्याचा धूर निघणारी ही भूमी आमच्यामुळे प्रगत होईल. अगदी पुराणकाला इतकी!

प्रधानजी : होय महाराज. आपण म्हणजेच हे नगर, हे राज्य. महाराज चक्रमादित्य म्हणजेच ही चक्रमपुर नगरी. आपण तारणहार, आपण सुखकर्ता, दुखहर्ता. आम्ही जी आरती म्हणतो तो निव्वळ उपचार नसतो, तर भक्तिभावाने मनापासून आपल्याबद्दल जे वाटते तीच भावना ओथंबून त्यातून भाव निपजतात आणि ओठांतून बाहेर पडतात. पण अजूनही शंकासुरांची औलाद सापडते मधूनमधून, आता त्यांची संख्या रोडावत चालली आहे. पण तरीही..

महाराज : असू द्यावे प्रधांजी. त्यांचा बंदोबस्त होत राहील. आम्हास ठाऊक आहे, जनता आमची आहे. आम्ही आहोत म्हणून जनता आहे.

आम्ही आहोत म्हणून देश आहे.. आमचे पूर्वज थोर होते, महान होते. या देशातून सुवर्णधूर निघत असे. अशा महान राज्यकर्त्यांचे आम्ही वारस. आणि आपले पूर्वज ते वानर. आणि आता तुम्ही शोधाल ते हे मर्कटवीर..

त्यांच्या नावे स्पर्धा आणि बक्षिसे.. उत्तम. अतिउत्तम. अशी माकडे आपल्या राज्याची शान असतील.

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : आज आम्ही खूपच खूश आहोत.. आता आम्ही चिंतनात वेळ घालवू इच्छितो..

प्रधानजी : महाराज.. जशी आपली इच्छा महाराज..

महाराज : म्हणजे दरबार बरखास्त करावा?

प्रधानजी : होय महाराज..

महाराज : म्हणजे तुम्हाला शाळा लवकर सुटल्यासारखा आनंद होतोय का प्रधांजी?

प्रधानजी : होय महाराज. नाही.. तसं नाही महाराज.. म्हणजे होय महाराज.. नाही म्हणायला होय महाराज.. म्हणजे होय नव्हे नाही महाराज.. म्हणजे होय महाराज..

महाराज : नक्की काय प्रधांजी? होय की नाही?

प्रधानजी : होय महाराज..

महाराज : म्हणजे लवकर शाळा सोडावी? दरबारास सुट्टी द्यावी?

प्रधानजी : होय महाराज.. म्हणजे नाही महाराज.. होय म्हणायला नाही..

महाराज : म्हणजे नक्की काय?

प्रधानजी : होय महाराज.. जशी आपली इच्छा महाराज..

महाराज : छान! आम्हास भाषा समितीस या शाब्दिक कसरतीबद्दल सांगावे लागेल प्रधांजी..

प्रधानजी : होय महाराज..

महाराज : आम्हाला हवी तशी देशप्रेमी जनता घडवली जात आहे. आम्ही खूश आहोत.. आता यावर नवीन कुठली समस्या नको.. या आनंदाच्या प्रसंगीच दरबार बरखास्त करावा म्हणजे चांगले ..

प्रधानजी : होय महाराज.. आज्ञा महाराज.. बरबार दरखास्त.. क्षमा असावी.. दरबार बरखास्त..

दरबारी : महाराजांचा विजय असो..!

३.

महाराजांचा सूट टाय आणि पँट सारेच खास आहेत. सुटावर देशाचा नकाशा आहे.. टायवर देशातील सर्वात उंच चक्रम मनोऱ्याचा फोटो आहे. हातातील फुलातून बटण दाबत महाराज सुगंधी फवारा उडवतात.. फवारा पटकन उडत नाही. महाराज परत परत बटण दाबत राहतात. फवारा उडत नाही. पाठून तत्परतेने शिपाई गुलाबदाणी घेऊन येतो आणि फुलावर अत्तर शिंपडतो. महाराज प्रसन्न होत त्या गुलाबदाणीकडे कौतुकाने पाहात सिंहासनावर बसतात.. नि फुलाचा वास घेतात.

दरबारी : राजाधिराज चक्रमादित्य महाराजांचा विजय असो..

आरती सुरू होते..

आरती चक्रम राजा
महा मानव तेजा
घाबरती शत्रू सारे
करिती उगाच ये जा..
आरती ..

वठणीवर आणशी सर्वा
कुणाची न करशी पर्वा
विरोधक रिपू ठेचा
आम्हां वाटे तुझा गर्वा..
आरती..

नाही किमयेस अंत पार
विरोधक खाती कसे खार
तुजसम नाही कोणी
नशिबवान आम्ही फार..
आरती..

तुजविण आम्हा कोण
तुजविण सारेच गौण
चढविशी लीलया तू
सर्व विरोधकांवर लोण..
आरती..

राजाधिराज चक्रमादित्य महाराजांचा त्रिसहस्त्र त्रिशतक त्रिदशक त्रिवार विजय असो.. विजय असो..

महाराज : शाबास! ती गुलाबदाणी. अत्तर शिंपडणारी. आमच्या ई फुलापुढे सरस ठरली. आमचे ई फूल.. फेल. फोल. आमच्या पूर्वजांची गुलाबदाणी.. अजूनही काम देते.. प्रधांजी..

प्रधानजी : होय महाराज..

महाराज : यातून काय बोध घेतलात प्रधांजी?

प्रधानजी : होय महाराज.. जेथे काम न येई कोणी.. तेथे कामी येई गुलाबदाणी..

महाराज : थोडक्यात?

प्रधानजी : जुने ते सोने..

महाराज : नव्हे, जुने तेच सोने.. आपले पूर्वज धन्य होते. कर्तृत्ववान होते. महान होते. अगदी आपले पूर्वज मर्कटवीर देखील. म्हणूनच पुरातनाची आम्हाला ओढ आहे..

प्रधानजी : होय महाराज!आम्हाला अंदाज आहे महाराज. म्हणूनच आम्ही पुनरूज्जीवन समिती स्थापन करण्यासंबंधी आपली परवानगी घेण्याचा प्रस्ताव आजच सादर करणार आहोत..

महाराज : शाबास प्रधांजी. आम्ही अत्यंत ग्रेट आहोत. रत्नपारखी आहोत. आम्हाला आमचा अभिमान वाटतो. म्हणूनच आम्ही तुमच्यासारखे मंत्रीगण नि वेगवेगळ्या समित्या नेमल्या आहेत.. पुनरूज्जीवन समिती! वा! आम्ही ही समिती आधी नेमली होती का? मग बरखास्त केली.. नि तिचेच आता पुनरूज्जीवन?

प्रधानजी : होय महाराज.. म्हणजे नाही महाराज..

समिती आपण आदेशल्यानंतरच स्थापन होईल महाराज. आपण फक्त हुकुमावे महाराज..

महाराज : अशा समितीसाठी आम्ही आपल्या राज्याची तिजोरीही उघडून देऊ. आपले महान पूर्वज.. सारे काही पुनरूज्जिवित करा..

प्रधानजी : होय महाराज..

महाराज : पुनरूज्जीवन समितीस आपली गेल्या दीड हजार वर्षांपासून असणारी परंपरा तपासून घेण्यास सांगा. त्याप्रमाणे आज काय बदल करावेत याचा पूर्ण अहवाल द्यायला सांगा. पूर्णपणे खोलात जाऊन हे कार्य होऊ द्या. चारीबाजूने सखोल अभ्यास होऊ द्या. प्राचीन परंपरा आणि प्रथा यांचा कीस पडू देत. आजवर आपण वर्तमानात जगत आलो आहोत. आता भविष्यात आम्ही वर्तमान नाही तर भूतकाळात जगावयास शिकू. भूतकालीन प्राचीन संस्कृतीत सारे काही होते. आज विज्ञान विज्ञान म्हणून डांगोरा पिटला जातो.. ते सारे तेव्हा होते. तेव्हा ते तसे होते म्हणून आपण असे आहोत.. पुनरूज्जीवन! होय! पुनरूज्जीवन! आम्ही चक्रमादित्य महाराज, चक्रवर्ती सम्राट, राजाधिराज.. आज आम्ही आलो तेव्हा महालाबाहेरील झाडावर मर्कटलीला सुरू होत्या. अत्यंत आदराने आम्ही त्यांस नमस्कार केला.. हात जोडले.. त्या सुसंस्कृत मर्कटाने ही तसेच हात जोडले.. त्या आपल्या मानव वंशीय पूर्वजांची शपथ वाहातो .. आम्ही हे पुनरूज्जीवन घडवून आणणारच! मग भले कोणी कुत्सित देशद्रोही त्यास घड्याळाचे काटे उलटे फिरवणे म्हणो की आणखी काही.. अर्थात

अशांना आम्ही असेच काट्यावर लटकावू. आमचा आदेश आहे. समिती त्व ता ता बसवावी.

प्रधानजी : होय महाराज. आपल्या आदेशाबरहुकूम समितीचे गठन होईल.

महाराज : गठन! छान शब्द आहे. गठन. वापरत चला अधूनमधून..

प्रधानजी : होय महाराज. वापरू आणि करू सुद्धा.. गठन.

महाराज : बाकी राज्याची हालहवाल?

प्रधानजी : आपल्या आदेशानुसार. उत्तम. जनता आपल्या आदेशानुसार सुखी. गावोगावी तसे फलक लावले गेले आहेत. लेखक नि कवीवृंद आधी मनोरंजनात्मक लिहायचे त्यांस राष्ट्रप्रेमावरीलच सारे लिहिणे सक्तीचे केल्यापासून राष्ट्रप्रेम ओसंडून वाहात आहे. वैज्ञानिक आपल्या आदेशानुसार संशोधनात मग्न आहेत. गावोगावच्या बातम्या देणारे सारे बातमीदार फक्त राष्ट्रप्रेमाने भारलेल्याच बातम्या समजून उमजून देत आहेत. त्यावरून देशाच्या उत्तर ते दक्षिण नि पूर्व ते पश्चिम अत्यंत वेगाने प्रगती होत आहे. काही सीमाविभागांत अशांती असल्याची गुप्त वार्ता असली तरीही ती देशाच्या नागरिकांपर्यंत पोहोचू न देण्याचे आदेश असल्याने नागरिक निश्चिंत आहेत. दैनंदिन जीवनावश्यक काही बाबींच्या किंमती वाढल्याने जनता हवालदिल होईल असा अंदाज होता. परंतु आपल्या राष्ट्रप्रेम विभागाने वाढती महागाई हाच प्रगतीचा आलेख असल्याचे जनतेच्या मनावर असे बिंबवले आहे की त्यावर टीका करणाऱ्या कोणाचेही जनता ऐकण्याच्या स्थितीत नाही. याउलट अशा

टीकाकारांवरच हल्ले होण्याच्या घटना वाढत असल्याने चिंता करण्याचे कारण उरले नाही. कित्येक शंकासुर म्हणावेत असे लोक आता सुतासारखे सरळ झाले असून आपापली मते मांडण्यासाठी आसुसलेले काही विविध गुन्ह्यांखाली गजाआड आहेत. त्यामुळे इतर कित्येक राष्ट्रद्रोह्यांस जरब बसली आहे. हाताच्या बोटावर मोजावेत इतके काही थोडे बाहेर मोकळे असले तरी त्यांस कशात गुंतवून कैदखान्यात बंद करावे याबद्दल गुप्तचर विभाग खल करीत आहे. एकूण देशप्रेमाच्या लाटेत सर्व समस्यांचा जनतेस विसर पडत आहे. एकूण सर्व आबादीआबाद असल्याचे चित्र आहे.

महाराज : शाबास प्रधांजी. ह्या राष्ट्रप्रेमाची गुटिका जनतेने प्राशन केल्याने आपल्यापुढील कित्येक समस्या सुटत आहेतच.. पण जनता हीच आपली प्रतिनिधी असल्याने सारे काही सुकर होत आहे. तरीही प्रधांजी, पुनरूज्जीवन विभागाचे काम जोमात सुरू करा. यापुढे पूर्वजस्मरण नि इतिहासातील न्याय अन्याय कथांबद्दल जनतेस ठाऊक होणे गरजेचे आहे. काही शतकांपूर्वीच्या गोष्टी जनतेस ज्ञात करून द्या. झालेला, आणि न झालेलाही अन्याय जनतेस ठाऊक असावा.. म्हणजे अस्मितेचे नि देशभावनेचे स्फुल्लिंग अखंड चेतवत ठेवा. त्या ज्वालेत बाकी सारे विरोधी विचार जळून खाक होतील. त्या राखेकडे पाहून असे विचार येणारी मने ही भयभीत होतील. शेवटी हे राष्ट्र प्रगतीपथावर नेणे हे आमचे एकमेव जीवन ध्येय आहे. त्याकरीता आम्ही जनतेच्या मनात अखंड असणे जरूरी आहे..

प्रधानजी : होय महाराज. तसे आहेच आणि यापुढेही राहील. रस्तोरस्ती, गावोगावी, गल्लीगल्लीत आपल्या नावाचे फलक झळकत आहेत. त्यावर आपले आदेश वाचून जनता धन्य होत आहे..

महाराज : शाबास प्रधांजी. सारे काही सुरळीत चाललेले जनतेस दिसावयास हवे. बाकी समस्या काय, त्या असावयाच्याच!

प्रधानजी : होय महाराज. हुकुमाबर सारे काही..

महाराज : आम्हास आमचाच अभिमान वाटतो. आम्ही आहोत म्हणून देश आहे. राज्य आहे. आमच्यावर प्रेम म्हणजेच देशावर प्रेम.. आज आम्ही आनंदात आहोत. जरा विश्राम करावा म्हणतोय. अर्थात तेथेही आम्ही अखंड देशाच्या प्रगतीबद्दल विचार करतो.. आम्ही म्हणजेच देश आणि देश म्हणजेच आम्ही.. देशाची प्रगती.. आमची प्रगती. नव्हे आमची प्रगती हीच देशाची प्रगती.. नव्हे देशाची प्रगती म्हणजेच आमची प्रगती..

प्रधानजी : होय महाराज..

महाराज : दरबार बरखास्त प्रधांजी..

प्रधानजी : होय महाराज. जो हुकूम..

दरबारी : चक्रमादित्य महाराजांचा विजय असो..!

# ४

महाराज नेहमीच्याच सुटाबुटात. डायरेक्ट गुलाबदाणी हातात. तिला खाली एक बटण. ते दाबून फवारा मारत लांब श्वास घेतात. येऊन सिंहासनावर बसतात

दरबारी :

राजाधिराज चक्रमपूर हृदयसम्राट चक्रमादित्य महाराजांचा विजय असो..

आरती सुरू करतात.

जय देव जय देव तू राजा चक्रम महान
तूच भव्य दिव्य बाकी सारे लहान

सर्व चक्रमपुरीत आम्ही सारे दीन
तुजपुढे सारे असती अगदीच हीन
भले भले घालिती शेपूट तुजपुढती
तुजपुढती आवाज सर्वांचा क्षीण..
जय देव..

आकाशी सूर्य आणि ग्रह तारे शशिकांत

तुजवाचून या देशी माजे नुसता आकांत
तैसा चक्रमपुरी तू एकचि एक नृपेंद्र
तव विरोधी कोणास तू पुरवी एकांत..
जय देव..

नशिब थोर बलवत्तर म्हणूनी राजा तू असशी
बाकी कवणाच्या ना पडेल चक्रमपुर फशी
देऊ उदाहरण कसले कोणास काय
बाकी कानतुटके कप अन तूच एक बशी..
जय देव..

राजाधिराज चक्रवर्ती महाराज चक्रमादित्यांचा त्रिसहस्त्रवार विजय असो.

महाराज : छान! आरती ऐकली की मखरात बसल्यासारखे वाटते.

प्रधानजी : होय महाराज. स्वर्गस्थ इंद्र अन चक्रमपुरी नृपेंद्र चक्रमादित्य महाराज..

महाराज : आपले लेखक आणि कवी अत्यंत चांगले काम करत आहेत प्रधांजी. चरणदास कवी जग सोडून गेला पण या सर्वांस चांगलीच शिकवण देऊन गेला. आम्ही दरवेळी अचंब्याने ऐकत असतो. इतके योग्य शब्द.. योग्य वर्णन..

प्रधानजी : होय महाराज.. चक्रमपुराचे भाग्य थोर म्हणून महाराज आपल्याला लाभले.. असे जनसामान्यांचे मत असल्याचे आपली जनाधार पाहणी

समिती म्हणते. आणि महाराजांमुळेच देश प्रगतीपथावर असल्याचे संदेश या समितीने जनतेस धाडले आहेत. जनतेत याबद्दल एकमत आहे. काही थोडे याहीबाबतीत शंका काढणारे आहेतच. पण उडदामाजी काळे गोरे असायचेच. त्या काही काळ्यांचे तोंड कायमचे काळे करण्याची व्यवस्था आपले गुप्तचर करत आहेतच. तसेच समितीच्या अहवालानुसार हे सारे बदमाश व देशद्रोही असल्याचे साधारण जनमत असल्याने चिंता नसावी. या सर्व कृष्णमुखी शंकासुरांवर लक्ष आपली जनताच आपले प्रतिनिधी बनून करत असल्याने आपल्यावरील भार ही हलका होत आहे. त्यामुळे ही आरती शब्दश: खरी आहे महाराज. आज जनतेत आपल्याबद्दल आदर आणि धाक आहे जसा तो देवाबद्दल असतो..

महाराज : प्रधांजी.. याबद्दलच आम्हाला काही बोलायचे आहे..

प्रधानजी : हुकुमावे महाराज. तुम्ही आदेशावे आणि आम्ही ऐकावे. आपण आज्ञावे आणि आम्ही ते पालनावे..

महाराज : प्रधांजी, आम्ही आज अस्वस्थ आहोत. आज आमची गुलाबदाणी व्यवस्थित सुगंधाचा फवारा मारत असली तरी आम्ही कानोकानी ऐकू येणाऱ्या काही वार्तांमुळे अत्यस्वस्थ आहोत..

प्रधानजी : राजवैद्यास त्व ता ता बोलावणे धाडतो महाराज. आपण विश्राम करावा. लाखांचा पोशिंदा जगणे जरूरी आहे. त्यासाठी आम्ही लाखभर तर आजवर मारले असतीलच.. खरोखरीचे वाच्यार्थी वा भावार्थी.. यापुढेही मारत राहू..

महाराज : प्रधांजी.. वैद्यांचे येथे काय काम? आम्ही अत्यवस्थ आहोत.. म्हणजे अत्यंत अस्वस्थ आहोत..

प्रधानजी : आम्हास चिंता आहे महाराज.. अशी कोणती गोष्ट आहे महाराज जी तुम्हाला अत्य-अस्वस्थ करण्याची हिंमत करू शकते? आमच्या हाती लागली तर आम्ही तिचा नायनाट करू. कितीही ताकद असो तिची,आपली ताकद तिच्याहून प्रचंड आहे. आणि त्या गोष्टीसाठी आम्ही आकाश पाताळ एक करू. पृथ्वीवरील महासागरास अडवू. पर्वतांस खणून सपाट करू. आकाशात भ्रमंती करू आणि गरज पडल्यास पृथ्वीच्या पोटात नि पाताळात धडक मारू.. पण त्या गोष्टीचा नि:पात केल्यावाचून आम्ही राहणार नाही.. आपण फक्त आदेशावे, निर्देशावे, आज्ञावे नि हुकुमावे..

महाराज : ही बाब गोपनीय आहे प्रधांजी. अत्यंत गोपनीय., तेव्हा दरबारी मंडळीस रजा द्या. तुम्ही फक्त थांबावे. आम्ही तुम्हाला सारे कथन केल्यानंतर यावर मार्ग शोधून काढता येईल..

प्रधानजी : आज्ञा हुजूर.. सर्व दरबाऱ्यांनी निघून जावे. महाराज अस्वस्थ म्हणजे देश अस्वस्थ. चक्रमपुरावरील या संकटाचा मुकाबला केल्यावाचून आम्ही राहणार नाही..

सगळे दरबारी निघून जातात..

प्रधानजी : सांगावे महाराज..

महाराज : प्रधांजी, दूरदूरदेशी राजे महाराजे कसे आनंदाने राज्य करतात. शांतपणे. कसला घोर नाही जिवास.. वर जनता कशी प्रसन्न असते. त्यात त्यांचा ऐषोआराम. जनानखाना मोठा. शिकारी. शौक. आम्ही हे सारे करत नाही. एकच एक ध्येय. आमचे राज्य. राज्य म्हणजे हे सिंहासन. ते तख्त. त्यावर आम्ही विराजमान. एकच ध्येय. प्रगती. जनता आमची आम्ही म्हणू तशी सुखाने राहील. आम्ही सांगू तशी राहील. जशी राहिल त्यास सुखाने राहील म्हणेल. आम्हालाच देश मानेल.. आम्ही म्हणजे देश, देश म्हणजे आम्ही. जनतेला आमच्याशिवाय पर्याय नाही आणि नसेल. आम्ही भाग्यविधाता. सर्वेसर्वा. कर्तुम अकर्तुम सत्ता आमच्या हाती. ती सर्व या जनतेच्या कल्याणासाठी. कल्याण म्हणजे काय ते आम्ही ठरवणार. कारण आमच्याशिवाय या देशास तारणहार कोणी नाही. हा देश आमच्यावाचून पुढे जाणार नाही.. आम्हाला असे वाटते.. त्यात आमचे काही चुकतेय का प्रधांजी?

प्रधानजी : होय महाराज..

महाराज : काय?

प्रधानजी : होय म्हणजे.. नाही महाराज..

महाराज : नाही म्हणजे होय की होय म्हणजे नाही प्रधांजी?

प्रधानजी : होय.. म्हणजे चुकत नाही महाराज..

महाराज : पण आमच्या कानावर यामुळे देशोदेशीची मतमतांतरे आली आहेत..

प्रधानजी : कोणती महाराज?

महाराज : आमच्या ह्या विचारांस तिकडे हुकुमशाही मनोवृत्ती असे संबोधतात म्हणे! आम्ही हुकुमानुसार जनतेस नाचवतो आणि आम्हास हवे तसे राज्य चालवतो.. छे! छे! आमच्या कानावर असे कठोर शब्द..

प्रधानजी : आपण चिंता करू नये महाराज. देशविदेशातील लोक आणि विशेषत: तेथील राज्यकर्ते आपल्या जनप्रियतेमुळे हवालदील आहेत असे ऐकून आहोत आम्ही. तेव्हा आपण, आपले राज्य, आपला देश यांच्याविरोधात जमेल तेव्हा जमेल तसे अन जमेल तितके बोलणे हेच त्यांचे परराष्ट्र धोरण असावे महाराज. आपण यांच्याकडे दुर्लक्ष करावे..

महाराज : हुकुमशाही? आम्ही राजधर्माचे एखाद्या धर्माप्रमाणे पालन करतो.. आम्हास त्याचा अभिमान आहे.. त्याबद्दल जनमानसात..

प्रधानजी : क्षमा असावी महाराज.. पण आपल्याबद्दल मत कलुषित करण्याचा हा परकीय कट असावा महाराज..

महाराज : असेच असावे. अहोरात्र उत्कर्षासाठी झटतो आम्ही.. जनतेत संभ्रम पसरवण्याचे राष्ट्रद्रोही कृत्य.. प्रधांजी..

प्रधानजी : हुकूम हुजूर..

महाराज : आपल्याच घरात कोणी भेदी आहेत किंवा कसे ह्यावर बारीक लक्ष ठेवा..

प्रधानजी : होय महाराज. आजवरच्या आपल्या 'देशभक्ती प्रचार व प्रसार अभियान' कार्यक्रमाने अशांचा बंदोबस्त आता बाहेरच्या बाहेर जनताच करत आहे. देशद्रोह म्हणजे काय ते जनता ठरवते, जनताच त्याची शिक्षाही देते.

आपल्याला तसदी न देता. त्यामुळे आपण राज्याच्या प्रगतीकडे जास्त ध्यान देऊ शकतो महाराज. तरीही घरभेदी देशद्रोह्यांस शोधण्याची मोहीम अजून तेजीने चालवण्याचे आदेश आपल्या आदेशावरून दिले जातील महाराज. अर्थात महाराजांनी मनस्ताप करून आपली तबियत नासाज करून घेऊ नये. आपले असणे आवश्यक .. तंदुरूस्त असणे अति आवश्यक.. लाखांचा पोशिंदा ..

महाराज : खरे आहे.. आम्ही आहोत म्हणून हे राज्य आहे. आमचा आम्हालाच अभिमान वाटतो..

प्रधानजी : आपली आज्ञा असेल तर महाराज एक सुचवू इच्छित आहे..

महाराज : बोलावे प्रधांजी..

प्रधानजी : महाराजांनी हे सारे आमच्यावर सोडावे.. आम्ही याबाबतीत जातीने लक्ष घालतो आणि आपणास अवगत करतो.. आपल्या आज्ञेनुसार..

महाराज : लवकरात लवकर करावे प्रधांजी..

प्रधानजी : जी हुजूर. आपण निश्चिंत असावे महाराज.. आणि महाराजांनी विश्राम करावा..

महाराज : विश्राम? सावधान! सदैव सावधान असावे.. अखंड सावधान! विश्रामास वेळ नाही. आम्ही आमच्या महालातही अखंड सावधान! दरबार बरखास्त झाला आहेच. प्रधांजी आपणही निघावे. आणि जलदीने याचा सोक्षमोक्ष लावावा..

प्रधानजी : हुकूम महाराज.. जशी आपली आज्ञा. आम्हाला निरोपावे.. आम्ही लवकरच याबद्दलची सुवार्ता घेऊन हजर होऊ महाराज..

महाराज : शाबास प्रधांजी. आम्ही अशी रत्ने पदरी बाळगून आहोत. रत्नपारखीच आम्ही. आम्हाला आमचाच अभिमान आहे.. आपण प्रस्थान करावे..

प्रधानजी : आज्ञा हुजूर. महाराजांचा विजय असो..

प्रधानजी निघून जातात.

# ५.

महाराज साध्या कुर्त्या पायजम्यात. थोडे चुरगळलेले. पायात चप्पल. हातात एक गुलाबाचे फूल. ते कागदी असावे.. शिपाई येऊन अत्तरदाणीतून त्यावर अत्तर शिंपडतो. महाराज दीर्घ श्वास घेतात. लांब श्वास घेत घेत दरबारात शिरतात.

दरबारी :

महाराजांचा विजय असो..

आरती सुरू होते

जय जय साध्व साधु सिंपल महाराज
उगा न डामडौल, पार पाडिती सारे काज

महाराज आमचे किती साधे सरळ
उगा विरोधी ओकिती गरळ

त्यांना न कळे महाराजांचा बाज
जय जय साध्व साधु सिंपल महाराज

चक्रमादित्यास सदैव चिंता जनतेची
त्यासाठी न पर्वा मग करती कुणाची
जनतेने म्हणुनी चढविला शिरावरी ताज
जय जय साध्व साधु सिंपल महाराज

सदा सदोदित सदैव काम काम काम
मागे सोडिती त्यासाठी सारा ताम आणि झाम
सर्वांसी त्यामुळे त्यांच्यावर गर्व, वाटतो नाज
जय जय साध्व साधु सिंपल महाराज

देशासाठी त्यागिती सारे ऐशो आराम
लोकप्रिय इतके, विरोधक लावती झंडु बाम
तरीही इतके साधे सिंपल काय त्याचे राज
जय जय साध्व साधु सिंपल महाराज

राजाधिराज चक्रमादित्य महाराजांचा विजय असो.. विजय असो.. विजय असो..

महाराज हळूहळू येत असताना मध्येच धडपडतात. साष्टांग नमस्कार घातल्यासारखे सिंहासनासमोर पडतात. दोन शिपाई महाराजांना उठवतात. हळूच महाराज सिंहासनावर बसतात.

प्रधानजी : धन्य आहोत महाराज आम्ही. महाराजांनी सिंहासनास केलेला साष्टांग नमस्कार सर्व दरबाराने पाहिला. महाराज सिंहासनासमोर नतमस्तक झाले.. सर्व चक्रमपुरीत हा संदेश जाईल महाराज.

महाराज : अतिउत्तम. आम्ही प्रसन्न आहोत.. कालचे मळभ दूर झाल्यासारखे वाटत आहे. शेवटी हे राज्य आहे म्हणून आम्ही आहोत, आणि आम्ही आहोत म्हणून हे राज्य. पण आम्ही आहोत हे असे आहोत. डामडौल नि ताम झाम कशाला? आम्ही आहोत ते जनतेसाठी.. प्रधांजी..

प्रधानजी : होय महाराज..

महाराज : कशासाठी होय प्रधांजी?

प्रधानजी : त वरून तिपाई महाराज..

महाराज : तिपाई? की ताकभात?

प्रधानजी : त वरून तपेली तिपाई आणि ताकभातही! म्हणजे तेच ते महाराज! आपणास काय म्हणायचे ते कळले महाराज.. आपल्या साधेपणाच्या

कहाण्या अन कथा आपले कवी अन लेखक लिहावयास बसवले जातील त्व ता ता, आपल्या आज्ञेनुसार. त्या चक्षुर्वैसत्यम कथा क्षणार्धात देशभर पसरवल्या जातील महाराज..

महाराज : जलदीने. आणि तो शब्द.. चक्षु काहीतरी.. चांगला आहे. आरतीत वापरा..

प्रधानजी : आज्ञावे महाराज आपण. आजच आपले कवी कामास लागतील.. तसा हुकूम काढला जाईल.. आज्ञापत्रे निघतील..

महाराज : असू देत. पण असे चुरगळलेले कपडे घालण्याची आम्हास सवय नाही. परंतु साधेपणाचा आदर्श जनतेसमोर ठेवायचा तर हे बलिदान आम्ही करायलाच हवे! आणि आम्ही नाहीतर दुसरे कोण करणार?

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : बाकी राज्याची हालहवाल?

प्रधानजी : उत्तम महाराज.. सुखी नागरिक स्पर्धा आयोजन करण्याचा आपल्या 'राष्ट्रप्रेम उपज निपज आणि खपज समिती'चा मनसुबा आहे महाराज.

महाराज : अतिउत्तम.. पण यात अत्यंत अटीतटीची स्पर्धा होईल. आमच्या राज्यात सुखी नागरिकांची काय कमी?

प्रधानजी : होय महाराज.

महाराज : परंतु त्या समितीचे नाव आमच्या कानावर आले नव्हते कधी.. राष्ट्रप्रेम उपज निपज आणि खपज समिती! वा! अर्थपूर्ण!

प्रधानजी : आम्ही कालच समिती बसवली आहे महाराज. त्या समितीने दिवसरात्र एक करून ह्या स्पर्धा आयोजनाबद्दल ठरविले आहे. फक्त आपण हुकुमावे..

महाराज : हुकूम? याबद्दल प्रधांजी बोलावयाचे आहे आपल्याला .

प्रधानजी : होय महाराज. जो हुकूम..

महाराज : तूर्तास ती सुखी नागरिक स्पर्धा आयोजावी. त्याबद्दलची माहिती आम्हास नंतर द्यावी. पण ज्या समितीच्या नावातच राष्ट्रप्रेम आहे, उपज नि निपज आहे आणि खपज देखील.. तिच्याबद्दल अधिक काय विचारावे आम्ही?

प्रधानजी : होय महाराज. होईल महाराज. आज्ञा महाराज. हुकूम महाराज..

महाराज : प्रधांजी.. कालच्या विषयाबद्दल आम्हास अवगत करावे.. आज चोवीस तास उलटून गेले. आमच्या गतिमान शासनात चोवीस तासांत समस्या समाधान होते.. त्यासाठी इतरांस रजा द्यावी..

प्रधानजी : जो हुकूम महाराज..

सारे दरबारी निघून जातात.

महाराज : प्रधांजी..

प्रधानजी : हुकूम महाराज..

महाराज : सर्वप्रथम प्रधांजी, आपल्या दरबारातून हुकूम शब्दाची हकालपट्टी करा. अगदी शिपाई हुकूमचंदाचेही नाव बदला. टिकमचंद ठेवा नाहीतर कुहूमचंद. पण आमचा हुकूमशाहीशी दुरान्वायानेही संबंध दिसावयास नको.. आमचा हा हुकूम आहे.. नव्हे आदेश आहे..

प्रधानजी : हुकूम महाराज.. क्षमा असावी.. आदेश महाराज!

महाराज : आदेशशाही हा शब्द कुठेही वापरला जात नाही. तेव्हा या पुढे दरबारात आदेश शब्दाचाच वापर होईल..

प्रधानजी : जसा आदेश महाराज! आज्ञा शब्दाबद्दल..

महाराज : तो शब्दही तसा सुरक्षित आहे..

प्रधानजी : होय महाराज.. आज्ञाशाही..

महाराज : प्रधांजी.. आम्ही काल सांगितलेल्या..

प्रधानजी : गृहपाठ तयार आहे महाराज.. आपल्या गृहखात्याने रात्रीतून ह्या प्रश्नांची उत्तरे काढली आहेत..

महाराज : काय म्हणतात ते प्रधांजी?

प्रधानजी : एका वाक्यात सांगायचे तर महाराज, जो प्रश्न म्हणून आपणापुढे उभा ठाकला, तो आपल्या राज्यात प्रश्नच नाही.. तर ते एक उत्तर आहे!

महाराज : कोड्यात बोलू नये प्रधांजी..

प्रधानजी : क्षमा असावी महाराज. आज्ञा असेल तर आम्ही पूर्ण रिपोर्ट वाचून दाखवतो. त्यात सर्व प्रश्नांची उत्तरे आहेत..

महाराज : अति उत्तम! आम्हास आमचाच अभिमान वाटतो. आमचे गृहखाते इतके त्व ता ता काम करणारे बनविले आहे आम्ही..

प्रधानजी : होय महाराज.. शास्त्रज्ञांकडून जनमानसाच्या मतांचा कानोसा घेत हे निष्कर्ष काढले आहेत महाराज..

महाराज : याचा अर्थ जनतेच्या मेंदूत येणाऱ्या विचारांची आगाऊ सूचना मिळण्याचे संशोधन पूर्णत्वास गेले? आणि आम्हास त्याची खबरबात नसावी..

प्रधानजी : क्षमा महाराज. पण हे शास्त्रज्ञ म्हणजे ते नव्हेत महाराज. हे समाजशास्त्रज्ञ. त्यांनी पाठवलेला हा अहवाल आहे महाराज..

महाराज : वाचावे प्रधांजी..

प्रधानजी : आदेश महाराज..

हा अहवाल म्हणतो:

१. चक्रमपुरीय जनता सूज्ञच नसून ती अति सूज्ञ आहे. तीस स्वत:चे भलेबुरे समजते. त्यामुळे स्वहित हे महाराज चक्रमादित्यांशीच निगडित असून महाराज चक्रमादित्य हेच चक्रमपुराचे भाग्यविधाता आहेत व ते प्रत्यक्ष भगवंताचा देहावतार आहेत याबद्दल जनतेच्या मनात संदेह नाही, याबद्दल समितीस संदेह नाही.

२. राजा हा देवाचा अंश असलेला अवतार असून त्याची पूजा ही भगवंताचीच पूजा आहे. त्यामुळे आदरणीय चक्रमादित्य महाराज हे परम वंदनीय व परम पूजनीय आहेत. ईश्वरभक्तीस ज्याप्रमाणे अंत नाही, मर्यादा नाहीत, त्याचप्रमाणे महाराज भक्तीसही मर्यादा नाहीत. त्यात काही

नागरिक शंका घेत असतील तर अशा पाखंडी नागरिकांस कडक शिक्षा व्हावी असे जनसामान्यांचे मत आहे. याबद्दल कडक कायदे करण्यास महाराज सक्षम आहेत, तरीही विविध पातळ्यांवर महाराज अहर्निश कार्यमग्न असताना या बाबींचा अतिरिक्त बोजा त्यांच्यावर पडू नये म्हणून अशा प्रसंगी जनताच त्या पाखंडींचा समाचार घेईल. अन्यत्र राजा हा जनतेचा प्रतिनिधी असतो, पण चक्रमपुरातील अनन्य साधारण महाराज हे देवाने खास उद्धाराकरिता पाठवलेले देवमाणूस असल्याने येथे जनता ही महाराजांची प्रतिनिधी आहे. त्यामुळे ती महाराजांचा उपमर्द सहन न करता मर्दपणा दाखवत अशांचा बीमोड करुन मोडीत काढेल.

३. देवाचा अंश महाराजांत असून, भगवंत सर्वत्र असू शकत नसल्यानेच त्याने कृपावंत होऊन चक्रमपुरी आपला प्रतिनिधी पाठविला आहे. अशा साक्षात देवाच्या प्रतिनिधीचे प्रतिनिधी होण्याचे भाग्य चक्रमपुरीय जनतेस लाभलेले असताना, अशा ह्या परमेश्वराच्या प्रतिनिधी महाराजांचा कोणताही हुकूम हा प्रत्यक्ष परमेश्वराचा आदेश मानला जावा. त्यामुळे त्याबद्दल कोणताही प्रश्न वा शंका उपस्थित करणे हा द्रोह व प्रत्यक्ष भगवंतावर अविश्वास ठरवला जावा याबद्दल जनमानसात यत्किंचितही किंतु नाही.

४. अन्यत्र हुकुमशाही राजवटींबद्दल समाजशास्त्रात कित्येक आक्षेप घेतले गेले असतील. परंतु चक्रमपुरातील परिस्थिती अपवादात्मक असून येथील महाराज चक्रमादित्य एक अपवादात्मक ईश्वरावतारी राज्यकर्ते आहेत. त्यामुळे त्यांचा एकेक इशारा व आदेश हे परमेश्वरी संकेत असून

जगभरातील कोणासही त्याबद्दल आक्षेप घेण्याचा अधिकार तसेच पात्रता नाही. कित्येक ठिकाणी या उलट लोकशाहीचा अतिरेक होत असून लोकानुनयामुळे राज्यकर्त्यांचे हात बांधले जात आहेत. दुनियेने काहीही म्हटले तरी कल्याणकारी हुकूमशाही चक्रमपुरीयांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक आहे.

५. आमच्या गुप्त पाहणीतून महाराजांचे तडकाफडकी आदेश व धडाडी याबद्दल जनमतात अत्यंत आदर व धाक असून सुदर्शन चक्रासारखी अस्त्रे वापरत विरोधी आवाज चिरडणे हे परमकर्तव्य महाराज अत्यंत कार्यक्षमतेने पार पाडत आहेत. त्याबद्दल चक्रमपुरीय जनता महाराजांचे सदैव ऋणी राहील. दुनियाभरच्या मतानुसार महाराजांनी हे सारे न बदलता आपले शक्तिशाली रूप सदैव दाखवत चक्रमपुरीयांचे कल्याण करावे. किंबहुना महाराजांनी असा अनुनय केल्यास 'वुई वाँट तानाशाही' अशी मागणी करत देशभर मोर्चे काढण्यात येतील असे पाहणीत आढळले आहे.

६. थोडक्यात महाराजांच्या देवत्वाबद्दल जनता कोणाचेही काहीही ऐकून घेण्यास तयार नसून महाराजांनी आपले अवतारी कार्य संपूर्णात आणावे व या ग्लानिर्भवती चक्रमपुराचा उद्धार करावा अशी जनमानसाची इच्छा आहे.

महाराज : खामोश! प्रधांजी यापुढे एक शब्दही नको..

प्रधानजी : माफी असावी महाराज. आमच्याकडून काही चूक झाली असल्यास..

महाराज : चूक झाली असल्यास? प्रधांजी हा सर्व गृहपाठ कोणी करावयास सांगितला?

प्रधानजी : महाराज आपणच म्हणाला होतात..

महाराज : खामोश! हे सर्व आम्हाला ठाऊक नाही असे म्हणावयाचे आहे का? जनतेस काय वाटते या पेक्षा जनतेने आमच्याबद्दल काय वाटून घ्यावे.. हे आम्हीच ठरवतो. पण आम्हास बाकी कोण काय म्हणते याचा विचार करावाच लागतो.. आम्ही आमची व्यथा सांगितली.. ती आम्ही आहोत तसेच राहूनही आमची प्रतिमा कशी बदलता येईल याबद्दल होती.. दुनियेत आता लोकशाही या शब्दाची चलती आहे. राजेशाही आणि हुकूमशाहीस मान नाही. मरातब नाही. लोकशाहीच्या आवरणात हे सर्व असतील तर मात्र आहे.. प्रधांजी, आम्हास आत्मा बदलावयाचा नाही.. फक्त कपडे बदलावयाचे आहेत. आणि प्रथमच आमच्या प्रधांजींस आमचा विचार कळत नाही असे झाले आहे..

प्रधानजी : क्षमा असावी महाराज. नाक घासून कान पकडून क्षमा मागतो महाराज.. अभय असावे महाराज..

महाराज : तुम्हास सदैव अभय आहे आणि असेल. तूर्तास.. एवढे करा

प्रधानजी : हुकूम महाराज..

महाराज : खामोश! चुकांचा हिमालय रचता आहात.. हुकूम शब्द या राज्यातून हद्दपार होईल.. आम्ही आदेश दिला त्याचे इतक्यात उल्लंघन?

प्रधानजी : माफी महाराज. आजच हा शब्द प्रत्येक पुस्तकातून हटवण्याचा आदेश काढतो. हा शब्द वापरण्यावर कायमची बंदी आपल्या राज्यात असेलच, पण कोणी हा शब्द वापरताना आढळला तर सक्त आणि कडक कारवाई केली जाईल असे आदेश त्व ता ता काढतो. आपल्या हुकूमचंद शिपायाचेच नव्हे तर हुकूम नावाच्या राज्यातील एकूण एक व्यक्तींचे नामबदल करण्याचे आदेश काढतो. इतकेच काय पत्त्यांच्या खेळातील हुकुमाचे एक्के.. त्यांच्यावरही बंदी आणतो.. हकीम हा शब्द हुकुमाशी जवळीक साधतो.. त्यावर ही बंदी आणली जाईल. हे सारे त्व ता ता घडेल महाराज. विद्युतवेगाने सारे घडवून आणले जाईल. चिंता नसावी.

महाराज : अर्थातच. सारे काही त्व ता ता.. ही आमची पद्धतच आहे. त्व ता ता.

प्रधानजी : होय महाराज..

महाराज : आपण आता यावे प्रधांजी. आम्हास आता विचार चिंतन मनन या साऱ्यांची नितांत गरज आहे. आम्ही एकांतात चिंतन करू इच्छितो. आम्ही आमची म्हणजे राज्याची चिंता करता करता चिंतन करतो.. आपण यावे.

प्रधानजी : आज्ञा महाराज.. महाराजांचा विजय असो..

# ६.

महाराज परत नेहमीच्या सुटाबुटात. हातात गुलाबाचे फूल. त्याचा वास घेत आत येतात..

दरबारी : महाराजांचा विजय असो.

जय जय जी महाराज प्रजाजन हित सुखदाता
शरण तुझिया आलो तू एकच त्राता
जयदेव जयदेव..

तूच एक केपेबल हे चक्षुर्वैसत्यम
अन्यांस घ्यावे लागे कायम चूरण नित्यम
जयदेव जयदेव..

जनता असो सुखी तुमची आदेश तुमचा
जिंकते सर्वत्र खेळ असो लिंबू अन चमचा
जयदेव जयदेव..

तुझियामुळेच देश असो पथावर प्रगतीच्या
चक्षुर्वैसत्यम हे रेघा असो काळया दगडीवरच्या
जय देव जयदेव..

महाराज : वा! तो चक्षु शब्द आला. वा! आमचे कवी आणि लेखक अत्यंत हुशार आहेत. चरणदासाने बाकी काही नाही पण हे काम चांगले केले. गेला बिचारा! असो. दैवगतीपुढे इलाज नाही. प्रधांजी..

प्रधानजी : होय महाराज..

महाराज : राज्याची हालहवाल?

प्रधानजी : सूत्रांचा हवाला देऊन सांगावे तर जनतेचे हाल अजिबात नाहीत.. हालहवाल अत्यंत उत्तम आणि राज्य पूर्वपश्चिम आणि दक्षिणोत्तर ऊर्ध्वोअधर अष्ट बाजूंनी इष्ट असे उत्तरोत्तर प्रगतीपथावर आहे. आपली कृपा आहे महाराज. जनता अत्यंत सुखी आहे, आपल्या आदेशानुसार. गेल्या काही दिवसांत सर्व पुस्तकांतून 'तो' शब्द गायब करून नव्याने सारी पुस्तके छापण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे छापखाने रात्रंदिवस धडधडत आहेत. त्याने नवीन रोजगार निर्मिती ही होत आहे. कालपर्यंत एक लाख पन्नास हजार तीनशेपाच पूर्णांक सत्तावीस दशांश जणांची नावे बदलण्यात आलेली असून हे काम अत्यंत वेगाने सुरू आहे. अत्यंत अभिमानाची गोष्ट अशी की असे करणारा चक्रमपुर हा एकमेव देश असून हा एक विक्रम या चक्रमपुरी आपल्यामुळे होत आहे. त्यामुळे प्रजाजनांचा ऊर अभिमानाने भरून येण्याचे आदेश दिले गेले आहेत. आपली आज्ञाधारक जनता त्याप्रमाणे छाती पुढे करून अभिमानाने ताठ मानेने फिरताना दिसत आहे. एकूणच वातावरण देशप्रेमाने भरलेले व भारलेले असून आता कविजन अन

लेखकांबरोबरच सामान्य जनतेसही महाराज स्तुती लिहिण्याची स्फूर्ती मिळू लागली असल्याच्या वार्ता आहेत.

महाराज : आम्ही अत्यंत प्रसन्न झालो आहोत.

प्रधानजी : आपल्या कृपेचा वरदहस्त महाराज चक्रमपुरीय जनतेच्या शिरावर सदैव राहो अशी करूणा भाकत आहेत परमेश्वराकडे महाराज. त्यासाठी प्रार्थनासत्रे, होमहवन व पूजाअर्चा जनता करीत आहे. परमेश्वर भक्तीने मुक्ती मरणोपरांत मिळते तर महाराजकृपेमुळे या आयुष्यातच ती लाभेल अशी जनतेची ठाम धारणा आहे. त्यामुळे जनता सुखासमाधानात आहे. त्यामुळेच सुखी चक्रमपुरकराचा शोध घेण्याचे कठीण काम पार पाडण्यासाठी राष्ट्रप्रेम उपज निपज आणि खपज समितीच्या अखंड बैठका सुरू आहेत. एकंदर सर्व परिस्थिती..

महाराज : म्हणजे सारे काही सुरळीत दिसते आहे.. पण एक गोष्ट सोडून प्रधांजी. आमची काकदृष्टी चौफेर फिरत असते. त्यातून न सुटलेली एक अत्यंत गंभीर बाब आहे प्रधांजी..

प्रधानजी : माफी असावी महाराज. क्षमा असावी.. पण..

महाराज : प्रधांजी.. आपल्या वर्तमानपत्रीय प्रकाशनांवर आपले बारीक लक्ष असावयास हवे.. ते दिसत नाही. आम्ही गेले काही महिने लक्ष ठेऊन आहोत.. दैनिक जनताकद, दैनिक न्याय या दोघांमधून काय लिखाण येते त्याकडे प्रधांजी आपले लक्ष आहे काय?

प्रधानजी : होय महाराज.

महाराज : मग त्यावर कोणती कारवाई झाली आजवर?

प्रधानजी : होय महाराज, आम्ही दोन्हींकडील सरकारी जाहिरातींचा ओघ अडवला आहे महाराज..

महाराज : इतके पुरेसे आहे? इकडे आपण सर्वसुखी कपिवर स्पर्धेची तयारी करतो आहोत. तिकडे बेरोजगारी, दुष्काळ, सर्वसामान्य रयतेच्या समस्या, महागाई यावर ही दोन्ही वर्तमानपत्रे गरळ ओकत आहेत. समस्या सोडवण्याहून त्यांचा विसर पाडणे हा जालिम इलाज आम्ही सर्व समस्यांवर योजत असताना या वर्तमानपत्रीय महाभागांची हिंमत होतेच कशी? असे करून जनतेचे दु:ख वाढवण्याचे महत्पाप ते करीत असताना त्यांना राज्यद्रोही का म्हणू नये?

प्रधानजी : होय महाराज. परंतु त्यांच्यावर कारवाई केल्यास आपलीच न्यायदाता ही प्रतिमा..

महाराज : प्रधांजी.. आपण कित्येक वर्षे आहात आमच्यासोबत. ह्या बाबी कशा कराव्यात ते आम्ही सांगावे असे नाही. लवकरात लवकर त्या दोन्ही वृत्तपत्रीय सर्पांचे शत्रूदेशाशी संधान व संबंध आहेत ही बातमी छापून आणा. दै.लांगुलचालन, दै.चक्रमपुर सत्य, दै.राजनिष्ठ यामध्ये त्व ता ता संदेश पाठवा. त्याचप्रमाणे आपल्या पदरच्या कविगण आणिक लेखकांस कामास लावून याबद्दल अभ्यासपूर्ण भाषेत साहित्य प्रसारित करा. हे सारे त्व ता ता व्हावयास हवे. त्यानंतर आपली जनताच यांच्याविरूद्ध उभी ठाकेल याची खात्री आहे आमची.

प्रधानजी : होय महाराज. त्व ता ता अंमलबजावणी होईल. आपली आज्ञा असेल तर न्यायालयात..

महाराज : न्यायालय? आम्ही असताना? प्रधांजी, त्याची गरज नाही. दोन्ही वृत्तपत्रवाल्यांस कोठडीत ठेवा. न्यायालयापुढे आणण्याची गरज नाही. पुरेसा काळ अंधार कोठडीची हवा खाल्ली की आपोआप सुतासारखे सरळ येतील. महत्वाचे म्हणजे त्यांच्याबरोबरचा गुप्त व्यवहार सर्व लेखक कवी, बाकी वर्तमानपत्रे यांना ठाऊक होईल अशी व्यवस्था गुप्तपणे करा. म्हणजे ते पाहून बाकी कुणाची असा राज्यद्रोह करण्याची हिंमत होणार नाही. आणि सारे काही आपल्या राज्यघटनेच्या चौकटीत कसे बसवावे हे आम्ही सांगावे लागू नये प्रधांजी आपणास..

प्रधानजी : होय महाराज. राज्यघटना आणि त्याहूनही तिची चौकट ही सर्वोच्च हे आपण सांगितलेले तत्व आम्ही कदापि विसरत नाही महाराज..

महाराज : हे सारे त्वरीत होऊ द्यात. अखंड रहावे सावधान ह्याचा विसर पडू देऊ नये. आमच्या गुरूंनी सांगितले होते, शत्रू कसा वार करील सांगता येत नाही. विरोधाचा एकेक किंचितसा आवाज वा शब्द.. मोडून काढा. तयारी इथवर करा की असे विचार लिहावयासच काय, नुसता करावयासही कोणी धजू नये. कारण शेवटी राज्य आम्हास करावयाचे आहे, जनोद्धार आम्हास करावयाचा आहे. आणि राज्यास प्रगतीपथावर नेणारे ही आम्हीच. तेव्हा विनाकारण अशा विरोधी विचार करणाऱ्यांस चाप लावावयासच हवा. आमच्याहून जनहितदक्ष व जनहितलक्षी दुसरा कोण आहे? त्यामुळे व्यापक जनहितार्थ हे सारे आपद्धर्म म्हणून आम्हास करावेच लागेल.

प्रधानजी : होय महाराज.

महाराज : आणि एक.. गुरूजी सांगून गेलेत,

सकारात्मक विचारांची ताकद मोठी. नकारात्मक विचारांची सवय जनतेने सोडून द्यायला हवी म्हणून आम्ही जीवतोड प्रयत्न करीत असताना अशा नकारी लोकांचा अडथळा मध्ये यावा.. त्यांनी जनतेस जाणवणाऱ्या प्रगतीपथावर खोडा घालावा.. खोडच ती जित्याची. म्हणतात ना ती खोड त्याप्रमाणे मेल्याशिवाय जाणार नाही.

प्रधानजी : होय महाराज. मेल्याशिवाय जाणार नाही. आम्ही तत्काळ सारा बंदोबस्त करतो. महाराज, जोवर ते मेंदूतील विचार ओळखण्याचे तंत्रज्ञान विकसित होत नाही..

महाराज : तोवर आमच्यावर वैऱ्याचा प्रसंग! असो. आम्ही यांस पुरून उरतो. कारण जनताच आमची प्रतिनिधी आहे.

प्रधानजी : होय महाराज. तुम्ही तर आता थकून गेला असाल महाराज. किती आघाड्यांवर आपण एकटेच लढत आहात महाराज. राज्यांतर्गत नि राज्याबाहेरही शत्रू दबा धरून बसलेला. तुम्ही दो करांनी किती युद्धे, किती संग्राम, किती लढाया लढणार महाराज! आम्ही सारे पाहून अचंबित होतो महाराज..

महाराज : प्रधांजी, परमेशाने हेच जिवीत कर्तव्य म्हणून आम्हास या चक्रमपुरीत पाठवले. जिवात जीव असेतो आम्ही ते पार पाडणार. मग या छोट्या मोठ्या अडथळयांची ती काय तमा? आम्ही म्हणजे राज्य.. राज्य म्हणजेच आम्ही..

प्रधानजी : सत्य आहे महाराज. अगदी सत्य.. आपण आता विश्राम करावा. नाही म्हणजे सावधान राहूच आम्ही पण आपण जनकल्याणार्थ विश्रामावे महाराज..

महाराज : विश्रामावे? हे क्रियापद कधी झाले?

प्रधानजी : आपल्या भाषासुधार समितीच्या सुचनेनुसार महाराज. पुनरूज्जीवन समिती आणि भाषा, इतिहास सुधार समितीच्या बैठकांतून सुधारणांचा ओघ येत आहे. नवनवीन शब्दांचा साठा येत आहे महाराज. त्यातून प्रगती साधणे..

महाराज : सत्य आहे! शब्द हे सत्य, नव्हे, शब्द हेच सत्य, शब्द हे शस्त्र, शब्द हेच अस्त्र.. आणि शब्द हीच प्रगती.. अन शब्दावाचून न गती! राज्य करणे म्हणजे शब्दांचा वापर करणे.. अचूक आणि रामबाण! आश्वासनांचे शब्द.. आणि शब्दांचे इमले.. शब्दांचीच प्रगती आणि चुकारांना शब्दांचाच मार.. शब्द! आम्ही शाब्दिक प्रगती साधलीय.. आमच्या राज्यासाठी. जनता डोळे विस्फारून पाहतेय.. कान टवकारून ऐकतेय.. अजून काय हवे? दरबार बरखास्त!

प्रधानजी : आदेश महाराज..

दरबारी : महाराजांचा विजय असो!

# ७.

महाराज सुटाबुटात. जसे आत शिरतात, हातातल्या फुलावर शिपाई परफ्यूम मारतो. महाराज दीर्घ श्वास घेत आत येतात.

दरबारी : एक दोन तीन चार.. महाराजांचा जयजयकार

आरती सुरू करतात:

जयदेव जयदेव तू चैतन्यमूर्ती
तुजवाचून कोण करे कामना पूर्ती
जयदेव जयदेव..

आरती ओवाळू तुज चक्रमराजा
पिटू ढोल ताशे अन वाजवू बाजा
तुझ्या स्वागता येई उत्साहा भरती
जयदेव जयदेव तू चैतन्यमूर्ती..

घोर अघोर राजा अगोचर तू ऐसा
तुजला जाणे कोणी या जन्मी तरी कैसा
तुज जाणण्याचे करती प्रयत्न ते हरती
जयदेव जयदेव तू चैतन्यमूर्ती..

देवे दैवे ऐसे तुज चक्रमपुरी धाडियले
विचित्र देशद्रोहियांचे तू दातच पाडियले
तुजपाशी कल्पना बहुत त्या बिलकुल ना सरती
जयदेव जयदेव तू चैतन्यमूर्ती..

कोणी म्हणती तुज राजा सम्राट कुणी
ईश्वरावतार तूच एक शंका ना मनी
तव नामोच्चाराने सारे चक्रमपुरी तरती
जयदेव जयदेव तू चैतन्यमूर्ती..

महाराजांचा त्रिकोटी त्रिलाखी त्रिसहस्त्री त्रिशतकी त्रिदशकी त्रिएककी त्रि शतांशी त्रिदशांकी विजय असो..

महाराज : प्रधांजी हा नवीन विजय?

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : कोण आहे याचे लेखक?

महाराज त्या घोषणेने सुखावले की दुखावले याचा प्रधानजींना अंदाज येत नाही. त्यामुळे काय बोलावे न समजल्याने ते गुळमुळीत आवाजात बोलतात..

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : प्रधांजी, आम्ही विचारतो काय.. ठीक आहे आम्हास होय म्हणणारी सकारात्मक माणसे आवडतात.. परंतु आम्ही काही विचारले..

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : ही घोषणा आम्हास पसंत पडली.. गणिती पद्धतीची ..

प्रधानजी : अस्सं.. होय महाराज! आपल्या दरबारी लेखकांच्या मांदियाळीत एक गणिताचे प्राथमिक शिक्षक रूजू झालेत. त्यांनी खास लिहून दिलेली आहे महाराज..

महाराज : छान! म्हणजे अगदी सामान्य स्तरातील जनता ही राष्ट्र उभारणीत सामील होत आहे. वा! आम्ही प्रसन्न आहोत. सर्वसामान्यांच्या मनात राष्ट्रप्रेम..

प्रधानजी : माफी असावी महाराज. आम्ही ते वाक्य पूर्ण करतो. महाराजांच्या कृपेने सामान्यातिसामान्यांच्या धडधडत्या हृदयात राष्ट्रप्रेमाचे स्फुल्लिंग चेतवले गेले असून त्यात देशाभिमानाच्या ज्वाला धडधड पेटत आहेत, त्या उज्ज्वल वन्हीच्या प्रकाशात सारी चक्रमपुरी उजळून न निघाली तरच नवल! आणि हे सारे राजाधिराज चक्रवर्ती सम्राट चक्रमादित्य महाराजा यांच्याच धडाडीच्या कसबी आणि दैवी नेतृत्वामुळे शक्य होत आहे!

महाराज : वा! अति सुंदर!

प्रधानजी : होय महाराज! माध्यमिक शाळेतील मराठीचे शिक्षकही ह्या शब्दसेवेत सामील झाले आहेत.. त्यांनी हे शब्द..

महाराज : वा! शब्दसेवा! सुंदर. अति सुंदर. शेवटी सारे काही शब्द सेवा! शब्दसेवा हीच राष्ट्रसेवा!

प्रधानजी : असे कित्येक जण आपल्या ह्या राष्ट्र उभारणीच्या पवित्र कार्यात झोकून देत आहेत महाराज. त्याचप्रमाणे कित्येक आपापल्या परीने सहाय्य करीत आहेत. कालच सांभाळपुरात राष्ट्रविघातक लेखन करणाऱ्या दोन लेखकांस जनतेने स्वत: पुढाकार घेऊन धडा शिकविला आहे. त्यांनी कालच आपण प्रसृत केलल्या रोजगार व आर्थिक अहवालावर शंका उपस्थित करणारे लिखाण करण्याचे राष्ट्रविघातक कृत्य केले होते. परंतु आपल्या सतर्क व सदा सावधान जनतेने त्याबद्दल त्यांस अद्दल घडवली आहे. हे सारे महाराजांबद्दलच्या प्रेमादराभक्तीधाकातून होत आहे महाराज.

महाराज : वा! अति छान! छानच!

प्रधानजी : धन्यवाद महाराज. आपली इतिहास सुधार समिती आणि पुनरूज्जीवन समिती या दोघांचे एकीकरण व्हावे व संयुक्त कार्य करावे अशी मागणी होत आहे महाराज..

महाराज : अति योग्य. अतीव योग्य. दोन्ही विषय एक समान आहेत. त्यामुळे..

प्रधानजी : एकीकरणास प्रत्यवाय नसावा!

महाराज : वा! शब्द चांगला आहे. वापरावा! किंवा प्रत्यवाय शब्द वापरास प्रत्यवाय नसावा प्रधांजी..

प्रधानजी : होय महाराज! जशी आज्ञा महाराज.

महाराज : एकूण सारे सुरळीत दिसतेय प्रधांजी?

प्रधानजी : होय महाराज. सुरळीमध्ये.. नव्हे सुरळीत महाराज! आपली कृपादृष्टी आणि कृपाशिर्वाद असला तर काय बिशाद आहे कोणाच्या वक्र नजरेची. महाराज आपण आहात म्हणून हे राज्य आहे..

महाराज : आज आम्ही खूप खूश आहोत प्रधांजी. आम्ही बुद्रकपुरी सभा गाजविली. बुद्रुकपुरी, मौजेगाव वगैरे राजमान्य राजेश्रींचे संमेलन आम्ही गाजवले..

प्रधानजी : अभिनंदन महाराज. आम्ही वृत्तांत वाचला..

महाराज : अर्थात. आमचे भाषण उत्तम झाले..

प्रधानजी : अर्थात महाराज. आपले सारे काही उत्तम, अत्युत्तम, सर्वोत्तमच असावयाचे महाराज..

महाराज : आम्ही म्हणालो, राज्य चालवणे म्हणजे लोकेच्छेचा सन्मान करणे. राजेशाहीतही लोकशाही चालवता येते. लोक आणि लोक इच्छा ही सर्वोच्च. राज्य म्हणजे लोकांचे राज्य असावे. त्यांच्या इच्छा आकांक्षांना वाव मिळावा व राजसत्तेने त्यासाठी मार्गदर्शन करावे. मदत करावी, संधी उपलब्ध करून द्यावी. हे राज सिंहासन एक सेवेची संधी आहे. राज्यघटनेनुसार हे सेवेचे व्रत घ्यावे हे राजाचे प्रथम कर्तव्य आहे. मी पणा हरवून राजाने राज्यकारभार हाकावा. स्वत:स सर्वोच्च न समजता देश कारभार हाकणारा सेवक मानावे.. आम्ही हे सांगितले तसा टाळ्यांचा कडकडाट झाला.. सर्व समाजघटकांचा सर्व स्तरांवर सर्वांगीण विकास म्हणजेच राज्य..

प्रधानजी : अर्थात महाराज..

महाराज : आम्ही म्हणालो, राज्यघटना ही सर्वोच्च. पवित्र. तिचे पालन हे राजाचे कर्तव्य. इतकेच नव्हे, जनतेस आपली मते मोकळेपणाने मांडू देणे हे राजाचे कर्तव्य आहे. विविध विचारांच्या घुसळणीतूनच समाज पुढे जातो. जनतेस व्यक्ती,विचार,आचार,व्यवहार स्वातंत्र्य हे यशस्वी व लोकप्रिय राजासाठी आवश्यक आहे..

प्रधानजी : होय महाराज! आपण स्वत: यशस्वी व लोकप्रिय आहात तेव्हा हे सारे आपल्या राज्यात होत असणारच!

महाराज : आम्ही वर्तमानपत्रातून विविध संपादक लेखक कवी इत्यादींच्या विचार व्यक्त करण्याचे समर्थनच केले असे नाही, तर त्यांची मुस्कटदाबी करून राज्य चालवणाऱ्यांचा जागतिक स्तरावर निषेध व्हावा असाही ठराव मांडला. त्यास बहुतेकांनी अनुमोदन दिले. आमच्या भाषणाने सारेच स्तब्ध झाले. इतके की टाळया वाजवणे विसरले. आम्ही आमच्या जनतेचे जाहीर कौतुक केले. अशा जनतेच्या पाठिंब्यानेच आम्ही चक्रमपुराचा उत्कर्ष साधू शकलो हे ही आवर्जून सांगितले. त्याठिकाणी एक दोन पत्रकारांनी निषेध नोंदवण्याचा प्रयत्न केला.. बहुतेक आपल्या राज्यातील देशद्रोह्यांशी संधान असावे. अर्थात तो आवाज क्षीण होता. सत्याचा आवाज असा क्षीण व दुर्बळ नसतो प्रधांजी..

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : याचा मथितार्थ हा.. जो आवाज मोठा आहे, ताकदवान आहे, तोच सत्य! कारण सत्यातच ती ताकद असते. आमच्या बुलंद आवाजाचे कारण हेच.. आम्ही म्हणतो ते सत्यच!

प्रधानजी : आणि महाराज, आपण म्हणाल तेच सत्य!

महाराज : आम्ही असे विशाल संमेलनात जातो ना तेव्हा आम्हाला आमचा अजूनच अभिमान वाटतो. या चक्रमपुरास आम्ही इतके उच्च दर्जावर पोहोचवले आहे. आम्हाला आमचाच अभिमान वाटतो!

प्रधानजी : सार्थ अभिमान महाराज!

महाराज : आम्ही स्वकर्तृत्वाने इतके भारावलो आहोत की वाटते आज दरबार येथेच बरखास्त करावा..

प्रधानजी : आपण आदेशावे, आज्ञावे.. आणि दरबार बरखास्तावा महाराज..

महाराज : दरबार बरखास्त!

दरबारी महाराजांचा विजय असो!

दरबारी जाऊ लागतात.

महाराज : प्रधांजी, आपण थांबावे.

प्रधानजी : आज्ञा महाराज..

सारे दरबारी निघून गेल्यावर..

महाराज : मुद्दाम आपल्याला थांबविले प्रधांजी..

प्रधानजी : आदेशावे महाराज..

महाराज : प्रधांजी, मागील वेळेसारखी चूक नको. आम्ही जे बोललो तीस थियरी म्हणतात. प्रत्यक्षात प्रॅक्टिकल काही वेगळेच असते हे आम्ही सांगावयास नको!

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : विविध देशांत आपल्या राज्याची अशी प्रतिमा उभारावीच लागते प्रधांजी. फक्त एक ध्यानी धरावे..

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : आम्ही काहीही कितीही कुठेही कसेही बोललो तरी आम्ही तेच आहोत. मागे म्हणालो तसे, आमचा आत्मा तोच आहे.. विविध वेशभूषा रंगमंचाप्रमाणे धारण कराव्या लागतात.. इतकेच! शेवटी राज्य चालवणे हे ही राजकीय रंगमचावरील एक नाटकच आहे! आपला गैरसमज नको.. आपली ध्येयधोरणे तीच राहतील..

प्रधानजी : आज्ञा महाराज. आमच्या ध्यानात आले महाराज.. ध्येय ही तेच व धोरणेही तीच! आपण धन्य आहात महाराज..

महाराज : पण तरीही आम्ही आमच्या भाषणातील मुद्दे दरबारात सांगितले कारण..

प्रधानजी : त वरून तांब्या महाराज.. आपली ती भाषणे व्यवस्थित जनतेपर्यंत पोहोचतील महाराज, अगदी टाळयांच्या कडकडाटासकट. देशविदेशातून आपल्या महाराजांस मिळणारा मान पाहून जनतेस अजूनच अभिमान वाटल्यावाचून रहायचा नाही महाराज! अभिमान वाटायलाच हवा! तसा आम्ही आदेशच काढतो महाराज!

महाराज : शाबास प्रधांजी! आता आपण आमचे प्रधांजी शोभता. जावे आणि कामाला लागावे..

प्रधानजी : जशी आज्ञा हुजूर. आम्ही त्व ता ता कामास लागतो..

प्रधानजी निघून जातात..

# ८.

महाराज आत येतात. हातात एक मोबाईल. समोर शिपाई लॅपटा ॅपवरून काही करतो. महाराजांच्या मोबाईलमध्ये गुलाबाचे फूल दिसू लागते. महाराज मोबाईलचा वास घेत सिंहासनावर बसतात..

जय देव जयदेव श्री पुतळाविकास
एक तूच सुंदर बाकी सारे भकास
जय देव जयदेव..

विकासाचे बनविले असले प्रारूप
जनसामान्यां खाऊ घालिसि तेल अन तूप
तूच एक राजा महाराजा नृप
अन्य कोणास ना घालिसि धूप
जय देव जयदेव..

अनन्य साधारण तू, तू असाधारण
तुज संपविण्या शत्रू करिती जारणमारण
हाती तुझिया सत्ता चक्र सुदर्शण
निर्दालन दुष्टांचे करिशी संहारण
जय देव जयदेव..

सर्वांभूती पाहसी तू नागरिक एक

जमविशी सर्वांसी ऐसी सोयरिक
विरोधकांचे आवाज विरोध पडिक
प्रगती वरूनि लक्ष न ढळे क्षणिक
जय देव जयदेव..

अशा नृपतिवाचून सापडेना सोय
सापडे का सीडलेस आम्र विदाऊट कोय?
आकाशी मेघ, जमिनीवरी सागरातील तोय
समजावे ऐसा कृपाघन आमुचा भूपती होय
जय देव जयदेव..

महाराज : वा! असाधारण काव्य अन असाधारण

आभासी फूल. कधी न कोमेजणारे. आणि त्यासाठी ते झाडावरून तोडावयास नको.. त्यासाठी न हंगामाची गरज न अजून कशाची. गुलाबाच्या फुलांसाठी झाडांची काळजी खूप घ्यावी लागते म्हणे. पण या आभासी फुलासाठी काहीच नको. या आभासी फुलाचा आभासी सुगंध. कधीही न संपणारा. आम्ही ही याचा आदर्श ठेवून आहोत. विकास.. सर्वांगीण विकास.. आभासी विकास आणि आभासी सर्वांगीण विकास. कधीच न संपणारा.

प्रधानजी : होय महाराज! खरे आहे महाराज. म्हणूनच आम्हाला महाराजांचा अभिमान आहे महाराज. तो मात्र आभासी नाही महाराज!

महाराज : आज आम्ही खूपच प्रसन्न आहोत. खिन्न आहोत..

प्रधानजी : का खिन्न महाराज?

महाराज : आम्ही तो शब्द फक्त मिळताजुळता आहे प्रसन्नशी म्हणून वापरला प्रधांजी. आम्हास शब्दांची म्हणूनच गंमत वाटते! शब्द अन शब्द वापरून आम्ही राज्य उभे केले, ते पुढे गेल्याचे आम्ही सांगतो जनतेस.. त्यासाठी लागतात ते शब्दच. विकास म्हणतात त्याला. विलास अन विकास.. विकासाचा कल्पना विलास.. विकासाचे विलासी राज्य.. विलासाचा विकास.. विकासविलसिते अन विलासविकसिते.. शब्द कसे मिळते अन जुळते! अन तेच आम्हास फळते!

प्रधानजी : आज महाराजांचा मूड काही अलग आहे. आपली आज्ञा असेल तर काही खास मजकुराचे वाचन करावे असा विचार आहे महाराज..

महाराज : खास मजकूर?

प्रधानजी : होय महाराज. आपल्यासाठी दररोज लाखो लोक प्रार्थना करीत असतात, लिहित असतात. त्यातील एखाद दुसरे ..

महाराज : जरूर प्रधांजी. म्हणजे आमची सर्वसामान्य जनता ही शब्दांमागे धावू लागली तर! आम्ही सुन्न खिन्न प्रसन्न आहोत..

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : आजचा दिवस नक्कीच खास आहे. वाचावे! आम्ही ही पाहातो आमची प्रजा आमच्याबद्दल काय म्हणतेय ती.

प्रधानजी : जी हुजूर. सर्वात प्रथम एक खास पत्र आहे महाराज. दै.जनताकदच्या संपादकांचे. आपण काही दिवसांपूर्वी त्यांस कोठडीची हवा खाऊ घातली

होती. काही दिवसांतच राष्ट्रद्रोहाचा रस्ता सोडून ते मुख्यप्रवाहात आले असे दिसते महाराज.

महाराज : अस्सं. काय म्हणताहेत.. वाचा..

प्रधानजी : होय महाराज.. ते लिहितात, विचार हा एक विकार आहे, त्यातून विविध व्याधी जडतात. ह्या विकारामुळे अविश्वासाची बीजे रोवली गेली की समाजस्वास्थ्यास तडा जाऊ लागतो. समाजस्वास्थ बिघडवणे हा वर्तमानपत्रीय लोकांचा उद्देश कधीच नसावा. मूल आईच्या कुशीत जसे विश्वासाने झोपते तसे प्रजेने राजाच्या हरेक बाबीवर विश्वास ठेऊन निश्चिंत रहावे. एकदा महाराज आपले भलेच चिंतितात ही बाब मनात ठसवून पक्की केली की पुढे आपोआप महाराजांची हरेक कृती ही जनतेच्या हितासाठीच आहे हे पटू लागते. उदाहरणार्थ, आम्हीच राजदरबारातून आधी दिलेल्या आकडेवारीबद्दल काढलेले प्रश्न! आज आम्हाला जाणवते की आकडेवारी ही आकडे टाकण्यासारखी असते. जनतेस समस्येबद्दल सांगून तिची झोप मोडावी की ती समस्या अस्तित्वात नसल्याचे दाखवून तीस एखाद्या पालकाप्रमाणे आश्वस्त करावे? महान राजा तोच जो हे सारे आपल्या शिरावर घेऊन जनतेस त्या प्रश्नांची झळ जाणवू देत नाही. महागाईसारख्या प्रत्यक्ष जाणवणाऱ्या बाबींतही जनतेचे इतर बाबींकडे ध्यान वळविले की वेदना न जाणवाव्यात अशी कुशल वैद्यकासारखी व्यवस्था एक ते आपले कुशल महाराजच करू जाणोत. त्यात समाजात खुसपटे काढणाऱ्यांवर शस्त्रक्रिया करून काट्याचा नायटा होणार नाही याची खबरदारीही तत्परतेने महाराज घेतात. अशा अति

महान महाराजांबद्दल काही जण दाखवतात तो अविश्वास हा निव्वळ आकसापोटी, आढ्यतेपोटीच. त्यात समाजविघातक कावीळ झालेल्या देशद्रोही अशांची हात मिळवणी झाली की देशाची अधोगती होण्यास किती काळ लागणार? तेव्हा आज आम्ही कळकळीने सांगत आहोत, मोठ्या भाग्यामुळे चक्रमादित्य महाराज आपल्याला लाभले आहेत, त्यांना निर्वेधपणे राज्य करू द्यावे. त्यांची हर एक इच्छा, हर एक कृती, इतकेच काय हर एक श्वासच नव्हे तर हर एक जांभई, हर एक शिंक सुद्धा राष्ट्रोन्नतीसाठीच आहे हे समजून घ्यावे. बाकी समस्या काय.. त्या येत राहतील. सुटतील. नवीन येतील. त्यांच्याकडे लक्ष न देता अंतिमत: राष्ट्र उभारणीसाठी महाराजांचा जीव तीळ तीळ तुटतो याकडे ध्यान केंद्रित करावे..

महाराज : कोठडी मानवलेली दिसतेय. तरीही ह्यांच्यावर नजर ठेवा खात्री होईतोवर. आता दै.न्यायवाल्यांना कधी उपरती होईल?

प्रधानजी : होईल महाराज. अंतिम विजय सत्याचाच होतो महाराज. आणि चक्रमपुरी एकच सत्य, ते म्हणजे महाराज चक्रमादित्य. अजून एक पत्र आहे, ते एका बालकाचे आहे. आपण ऐकावे..

महाराज : वाचावे प्रधांजी.

प्रधानजी : आज्ञा हुजूर.. सांभाळपुरातील एका बालकाचे पत्र आहे महाराज. तिकडे काही समाजविघातक शक्तींचा नि:पात अलिकडेच जनतेने केला. बाल मनावर याचा झालेला परिणाम दिसत आहे महाराज.. चांगलाच.

आमच्याकडे त्यादिवशी जोरात फायटिंग झाली. काही माणसांनी दोघांना ढिशुम ढिशुम मारले. बाबा बोलले, की अशा लोकांना अशीच शिक्षा हवी. आणि देवच त्यांना शिक्षा देतो. ते मारणारे देव आहेत का मी विचारले तर बाबा बोलले की आपले महाराजच देव आहेत. मग तुम्ही आकाशात राहतात का? माझा मित्र बोलला की तुम्ही इकडे एका गावात राहतात. पण बाबा मोठे आहेत. त्यांनाच खरे माहिती आहे. तुम्ही पण शक्तिमान आणि हनुमॅन सारखे ताकदवान आहेत असे बाबा बोलले. फायटींग बघायला खूप मज्जा आली. परत असे फायटिंग होईल का? आम्हाला खूप खूप छान वाटेल. आमच्या शाळेत तुमच्या आरतीची प्रार्थना आम्ही म्हणतो. बाई म्हणतात, आम्ही नशिबवान म्हणून तुम्ही आमचे महाराज आहेत. नशिबवान म्हणजे काय ते मात्र बाई सांगत नाहीत. त्यांना हेडसरांनी नि हेडसरांना त्यांच्या सरानी तसे सांगितले सांगतात. आकाशात नसाल तर एकदा तुम्हाला बघायचे आहे. म्हणजे बाबा खरे बोलतात हे समजेल नि मित्राचा पचका होईल.

महाराज : वा! किती सुंदर. वाचून आमच्या डोळयांत पाणी आले.. (महाराज डोळे पुसतात)

प्रधानजी : होय महाराज..

महाराज : आमच्या प्रयत्नांस यश येत आहे. आता बालकांसही राष्ट्रप्रेमाचे धुमारे फुटत आहेत. याहून अधिक काय हवे? आम्ही कृतार्थ आहोत.. (परत डोळे पुसतात..) प्रधांजी..

प्रधानजी : त वरून ताटवा महाराज. आम्ही लवकरच आपले संवेदनशील मन जनतेस ज्ञात करून देऊ महाराज..

महाराज : तुम्ही असताना आम्हास चिंता करावयाची गरज नाही!

प्रधानजी : अजून एक चिठ्ठी आहे महाराज, काव्य रूपातील.

महाराज : वा! आमचे प्रजाजन अत्यंत शब्द प्रधान होत आहेत! ऐकवावी कविता प्रधांजी.

प्रधानजी: आज श्रवणेंद्रियांच्या तृप्तीचा दिवस दिसतो आहे.

महाराज : नुसतेच कान नव्हे. मन ही तृप्त होत आहे. आमच्या तपाला फळ येत आहे. जनता जागृत होत आहे. आपल्या भल्या बुऱ्याची जाण तिला होते आहे.. ऐकवावी ती काव्यरचना..

प्रधानजी : आज्ञा हुजूर.. पोवाडा आहे महाराज..

धन्य धन्य ते चक्रमपुर
त्रिलोकी कसे एक सुंदर
तिथे एक राजा आला जी
राजाने राज्याचा डाव मांडला जी
राज्याचा डाव मांडला जी.. जी..जी..

राज्य होतं ते चक्रमपुर
तिथे नांदती सुर आणिक असुर
कुणी म्हणे गाव ते किती बदसुर

आला तिथं चक्रमादित्य राजा शुरवीर
राजाने नवा डाव मांडला जी..
नवा गडी राज्य नवेच झाले जी.. जी .. जी..

चक्रमादित्याने सांभाळावे सिंहासन
काम मुश्किल भाऊ नाही आसान
भल्याभल्यांचे गळेल अवसान
पण राजानं घातलं धूमशान
राज्याचा बदलला नक्शा जी..
द्रोह्यांना देतदेत शिक्षा जी.. जी.. जी..

महाराज असले करतबगार
भल्याभल्यांस पाडती गपगार
त्यांचे कर्तुत पसरे सगळीकडे फार
नाठाळांच्या माथी काठी अन बसतसे मार
राजामुळं जनता जागरूक झाली जी
राज्याचा डाव मांडला जी.. जी..जी..

राष्ट्रभक्तीचा पाजिला डोस
देशद्रोही अड्डा पडला ओस
आणिला जनतेमध्ये जोश
कार्यक्रम दिला त्याने ठोस
राजामुळं असला बदल झाला जी
राजानं डाव नवा मांडला जी.. जी..जी..

इरोधकांवर घातला घण घाव
येकयेक ते गेले बाराचा भाव
पैलवान उठले मिशांवर देऊनी ताव
घरभेद्यांची आइकती सारे काव काव
एकेकाची मुंडी पिरगळली जी
नवा असा डाव, डाव मांडला जी.. जी.. जी..

असा हा सुलक्षणी देवावतार
त्याचे राज्यभरी भक्तगण फार
उगाच ना करती कसला विचार
स्वस्थ असे टाकुनी राजावर भार
शाहीर अभिमानाने पवाडा गातो जी
नव्या राज्याचे कवतिक मांडतो जी.. जी.. जी..

महाराज : वा! असामान्य प्रतिभाविष्कार! विलक्षण व विचक्षण शब्द योजना! असामान्य राष्ट्राभिमान!

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : जनतेसाठी आमचा ऊर भरून येतो. त्यांचे असे प्रेम आणि आदर पाहून आम्ही नतमस्तक होतो. एका सेवकाचा असा सन्मान.. आम्ही कृतार्थ आहोत प्रधांजी..

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : आज या शब्दरचना ऐकून आम्हास आनंद झाला आहे..

प्रधानजी : आम्ही सांगतो महाराज.. आज या राष्ट्रभक्तिरस प्रधान शब्दवर्षेच्या तुषारांचे काही टपोरे थेंब अंगावर घेऊन आम्हास सचैल स्नान करून शूचिर्भूत झाल्यासारखे भासत आहे! त्यामुळे चित्त प्रसन्न झाले आहे!

महाराज : वा! छान! आज या प्रसंगी 'महाराज शब्दसेवा पुरस्कारां'ची घोषणा आम्ही करत आहोत. अशा प्रकारचे अधिकाधिक योग्य असे राष्ट्रभक्तीपर लिखाण करणाऱ्या व्यक्तीस हे देण्यात येतील.

प्रधानजी : होय महाराज! आम्ही त्व ता ता समिती गठन करतो. स्पर्धेबद्दलचा तपशील बनवतो..

महाराज : तुम्ही ते करालच प्रधांजी. आम्ही असा कारभार करतो. आधी कळस मग पाया! आधी निष्कर्ष मग प्रयोग. आधी निर्णय मग विचार! ही त्व ता ता पद्धत आहे.

प्रधानजी : होय महाराज! ह्यासच खरी धडाडी म्हणतात महाराज! ह्या धडाडीमुळेच चक्रमपुरी प्रगतीपथावर आहे.. राष्ट्रप्रगतीचे चक्र गतिमान व्हायचे तर हे करावयास हवेच! खरेतर हेच करावयास हवे!

महाराज : आज आम्ही आता यापुढील विचार करू इच्छितो. म्हणजे अजून प्रगती कशी घडवावी..

प्रधानजी : म्हणजे दरबार बरखास्त?

महाराज : तशी दरखास्त करू आम्ही! पण तुम्ही शाळा लवकर सुटलेल्या मुलासारखे आनंदी दिसताहात प्रधांजी!

प्रधानजी : होय महाराज.. नाही म्हणजे नाही महाराज..!

महाराज : आम्हास समजते प्रधांजी.. दरबार बरखास्त..

प्रधानजी : जो आज्ञा महाराज!

दरबारी : महाराजांचा विजय असो!

# ९.

महाराजांच्या हातातील मोबाईलच्या मागे खरेखुरे फूल चिटकवलेले. त्याचा वास घेत आत येतात.

दरबारी : महाराजांचा विजय असो!

आरती सुरू होते..

परात्रमी वीर धन्य बघुनी तो दिव्य
जय जय जी महाराज चक्रम अति भव्य..
शत्रू संहारी, असो कितीही अवाढव्य
जय जय जी महाराज चक्रम अति भव्य..
उद्धारी देशास, करीत सारे सव्य अपसव्य
जय जय जी महाराज चक्रम अति भव्य..
पुराणपुरष पूजन, संस्कारी प्राशन पंचगव्य
जय जय जी महाराज चक्रम अति भव्य..
कणा पोलादी, कणखर बनला कसले ते द्रव्य
जय जय जी महाराज चक्रम अति भव्य..
तुच एक महाराज, आम्ही सारे एकलव्य
जय जय जी महाराज चक्रम अति भव्य..
तुजलागी सारे हवे वाटे भव्य दिव्य अवाढव्य
जय जय जी महाराज चक्रम अति भव्य..

चक्रमादित्य महाराज की जय!

महाराजांचा त्रिवार त्रिशतकी विजय असो!

महाराज : आम्हाला सारेच हवे ते भव्य! अति भव्य! भव्यातिभव्य! आम्ही आहोत दिव्य! शाबास! किती गहन काव्य! भव्य आणि दिव्य काव्य! सुंदर. अति सुंदर!

प्रधानजी : धन्यवाद महाराज! आपली आज्ञा असेल तर महाराज एक गोष्ट सांगायची होती.

महाराज : बोलावे प्रधांजी..

प्रधानजी : या काव्यातील काही शब्द आम्ही स्वत: सुचविले आहेत महाराज!

महाराज : कौतुक आहे! म्हणजे हे राष्ट्रभक्तीपर लिखाणाचे लोण आपल्यापर्यंत पोहोचले म्हणावे!

प्रधानजी : आपली कृपा महाराज! आम्हीही शब्दसेवेत आपल्यामुळेच महाराज.

महाराज : आम्हाला आमचाच अभिमान वाटतो. आम्ही धन्य आहोत. पण आज हे खरेखुरे फूल? आभासी फुलाच्या आभासास काय झाले?

प्रधानजी : क्षमा असावी महाराज. पण आज जरा नेट ची रेंज नाही इथे! त्यामुळे आभासी फूल दिसले नसते. पण आपण चिंता करू नये महाराज. आभासी विकास सुरूच राहिल..

महाराज : आपल्यासारखे मंत्रीगण असताना चिंता कशाची. नेट नसताना ही नेट लावून तुम्ही काम नीटपणे तडीस नेताच. आज काव्यरचना बहारदार झाली. आमच्या होकारी मनुष्य बळ या आधीच्या योजनेसही असेच यश लाभले.

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : राज्यात ठिकठिकाणी होकारार्थी उत्तरे देणारे उच्चपदांवर आहेत. आपण ही त्याच योजनेतून आलात प्रधांजी..

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : आपली ही योजना सफल होताना दिसत आहेच. त्यातून कुशल मनुष्यबळ उपलब्ध होताना दिसते आहे. आजही ही योजना अत्यंत वेगाने काम करत आहे. त्याच योजनेबरोबर आम्ही महाराज नि:प्रश्न सेवेकरी योजना राबवलेली होती..

प्रधानजी : ती योजना अत्यंत यशस्वी आहे महाराज. आपले कित्येक अधिकारी उत्साहाने नि:प्रश्न आज्ञापालन करत सेवेत वाटा उचलत आहेत. आजवर या योजनेतून आम्हीही खूप काही शिकलो महाराज..

महाराज : आम्ही त्यापुढील विचार करत आहोत प्रधांजी..

प्रधानजी : अर्थात महाराज. आपण द्रष्टे आहात. दूरवरील विचार करता आपण. त्यातून सारे काही उपजते व निपजते. त्यामुळे आपल्या सदैव राज्यहितैषी मनातील विचार चक्रमपुरीस पुढे घेऊन जाणारच असणार याबद्दल शंका

नाही महाराज. आम्ही नि:प्रश्न आपल्या आदेशाची अंमलबजावणी करूच.. त्व ता ता.

महाराज : आम्हास त्याबद्दल खात्री आहेच प्रधांजी. आपण आमच्या होकारार्थी संगठन योजनेचे प्रमुख, नि:प्रश्न सेवेकरी आज्ञापालनाचे प्रमुख, त्याचबरोबर निर्विचार अंमलबजावणी खात्याचे प्रमुख, आज्ञा अनुपालन.. म्हणजे पूर्वीची हुकूमपालन समिती त्याचे प्रमुख, अवज्ञा शिक्षा समितीचे प्रमुख वगैरे सर्व तुम्ही आपल्या ज्ञानाच्या जोरावर आहात..

प्रधानजी : होय महाराज! नाही म्हणजे आपली कृपा आहे महाराज!

महाराज : त्यामुळे आमच्या नवीन 'महाराज मौनं सर्वार्थ' योजनेची अंमलबजावणी तुम्ही तशीच तडफदारपणे कराल यात आम्हास शंका नाही.

प्रधानजी : होय महाराज! आपल्या योजनेसाठी नवीन समितीचे गठन त्व ता ता करतो महाराज..

महाराज : परंतु ही योजना काय कशी असावी याबद्दल विचारले नाहीत प्रधांजी?

प्रधानजी : होय महाराज! नाही म्हणजे आम्ही नि:प्रश्न आज्ञापालक. आणि आपण त्व ता ता, आधी निर्णय मग विचार करता. तेव्हा..

महाराज : शाबास! प्रधांजी म्हणूनच आम्हाला तुम्ही निवडलेय प्रधानपदी. आमची संकल्पना अशी आहे.. आजवर होय म्हणणारे तयार केलेत. आता मौन धारण करणाऱ्यांच्या तयारीस लागा. परिस्थिती कितीही विपरीत असो, वरून कसेही आदेश येवोत, निर्विचारानंतर त्यावर प्रतिक्रिया न देणारे

हवेत! आजूबाजूस काही घडो, मौन धारण करणारे हवेत. नि:प्रश्न योजनेत फक्त प्रश्न न विचारणारे तयार होतात, यात न बोलणारे तयार होतील..

प्रधानजी : होय महाराज! म्हणजे महाराज नि:प्रश्न.. नि:बोल, निर्विचार.. अशा एकेक पायरीवरील लोक तयार करावेत.. त्यांस आपल्या पूर्वसुरींचा आदर्श ठेऊन स्थितप्रज्ञ म्हणावे महाराज?

महाराज : बरोबर. बरोबर समजलात प्रधांजी. तेव्हा 'मौनं सर्वार्थ स्थितप्रज्ञ योजना' लवकरात लवकर अंमलात आणा..

प्रधानजी : होय महाराज! आपण आदेशावे आम्ही अंमलावे.. त्व ता ता.

महाराज : साध्या शब्दात सांगावे तर आम्हाला अशी गप्प बसा संस्कृती विकसित करावयाची आहे. आमच्या राजगुरूंनी हीच जनतेच्या सुखाची गुरूकिल्ली आहे असे सांगितले आहे आम्हास. जनता जितका कमीतकमी विचार करेल, जितके कमीतकमी प्रश्न विचारेल व जितकी जास्तीत जास्त गप्प बसेल तितकी ती सुखी होईल. शेवटी आम्ही ह्या सिंहासनावर आहोत ते जनतेस सुखी करण्यासाठीच ना? तिच्या सर्वांगीण सुखाची चिंता आम्ही नाहीतर कोण करणार?

प्रधानजी : होय महाराज! आम्ही त्व ता ता 'महाराज मौनं सर्वार्थ स्थितप्रज्ञ योजना समिती'चे गठन करतो महाराज.

महाराज : ते तुम्ही करालच प्रधांजी. राज्यातील नवीन काही?

प्रधानजी : होय महाराज! राज्यभरातील व्यापाऱ्यांचे मंडळ भेटीस आले होते महाराज..

महाराज : काय म्हणणे आहे त्यांचे? व्यापारी मंडळी कोणता अव्यापारेषु व्यापार करावयाची नाहीत!

प्रधानजी : होय महाराज! त्यांनी एक पत्र दिले आहे. आज्ञा असल्यास वाचून दाखवू महाराज..

महाराज : वाचावे प्रधांजी..

प्रधानजी : होय महाराज! व्यापारी मंडळ लिहितेय, जशी महाराजांस राष्ट्रहिताची चोवीस तास चिंता तशी व्यापाराचा व्याप वाढवण्याची आमची अष्टोप्रहर चिंता. व्यापारातून मिळणाऱ्या नफ्यातून अजून व्यापार वाढवणे हे आमचे उद्दिष्ट. त्यातून चक्रमपुरीची भरभराट होते, आमच्या भरलेल्या करांतून राज्य पुढे जात असते. व्यापाराचा उद्देश नफा मिळवणे असेल तर कररूपातून तो नफा कमी होत जातो. तेव्हा महाराज चरणी विनंती आहे की करसुटीसाठी व्यापारी वर्गासाठी खास विचार व्हावा. त्यातून वाढलेल्या व्यापारातूनच चक्रमपुराचे नाव दुनियेत अजून प्रसिद्ध होईल आणि व्यापारवृद्धीसाठी महाराजांचे नावही अजून मोठे होईल. करसुटीव्यतिरिक्त व्यापार उदीमासाठी सरकार दरबारातील परवाने सहजी मिळाल्यास व्यापारास अधिक अनुकूल वातावरण प्राप्त होईल व ते व्यापारास पोषक होईल..

महाराज : बास! प्रधांजी, थांबावे! व्यापारी वर्ग हा आमचा कणा आहे हे खरेच! करातील सूट आम्ही समजू शकतो, आणि ती दिल्यास त्याबदल्यात जनतेकडून व्यापारी करसवलतीवर जनता कर लावू शकतो. व्यापारवृद्धी म्हणजे देश पुढे जाणे. तेव्हा हा देशभक्ती कर म्हणून लावता येईल. त्याची

अंमलबजावणी त्व ता ता करावी. जनतेवर लावण्याच्या करासाठी राष्ट्रप्रेमाचे धडे नव्याने गिरवावे लागले तर ते तसे करण्यात विलंब लावू नये. खिशास कात्री जनतेने हसत हसत लावू दिली तर त्यांच्या मनात राष्ट्रविरोधी विचार फिरकणार नाही. तेव्हा सारे काही देशाच्या प्रगतीखातर! आणि या विरोधात लिहिणारे बोलणारे अजूनपर्यंत कोणी चुकून मागे राहिले असतील तर त्याबद्दल काय करावे हे आम्ही तुम्हाला सांगावे असे नाही.

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : पण त्यांची दुसरी मागणी मान्य करावी अशी नाही.

प्रधानजी : होय महाराज! त्यांना तसे कळवतो.. त्व ता ता..

महाराज : थांबावे प्रधांजी! आम्ही पूर्ण आदेशलो नाही अजून..

प्रधानजी : क्षमा असावी महाराज.

महाराज : व्यापारी वर्गास नाराज करावे असे नाही. तो वर्ग आमचा म्हणजे पर्यायाने आपल्या राज्याचा मोठा पाठीराखा आहे.

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : तेव्हा त्यांची मागणी अमान्यही करू नये आणि मान्यही होणार नाही असे करावे.

प्रधानजी : म्हणजे विचाराधीन आहे असे कळवावे?

महाराज : नव्हे प्रधांजी. मान्य आहे असे कळवावे!

प्रधानजी : होय महाराज! पण ते अमान्य..

महाराज : प्रधांजी, परवाना पद्धतीत बदल करण्यासाठी मान्यता देण्यात यावी. त्व ता ता. कशी करावी याचा विचार नंतर होईलच. निर्णय झाला की मार्ग सापडतोच!

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : व्यापारीवर्गाशी बोलताना त्यांस त्यांच्याकरिता आम्ही लाल गालिचा अंथरू इच्छितो हे सांगावे.

प्रधानजी : होय महाराज! पण आम्ही समजलो नाही महाराज..

महाराज : प्रधांजी, लाल गालिचा अंथरावाच. फक्त हा लाल गालिचा दरबारी लाल फितींचाच असावा. व्यापारी वर्गास त्याची जाणीव होऊ न देता त्या लाल फितींचा गालिचा अंथरला जावा!

प्रधानजी : आता समजले महाराज! बदल कशातच न होता बदल झाल्यासारखे दाखवता येईल. व्यापारी खूश होतीलच पण दरबाराच्या नियंत्रणाखालीच राहतील. आपण धन्य आहात महाराज..

महाराज : प्रधांजी, व्यापारी वर्गाचे महत्व आम्ही सांगावे असे नाही. तेव्हा त्यांना नाराज करू नयेच. परंतु दरबाराचे महत्व त्याहून मोठे. परवाना पद्धती हा व्यापारीवर्गावरचा लगाम आहे. वेगवेगळ्या समाजघटकास आपल्या नियंत्रणात ठेवण्यासाठी उपाय वेगवेगळे योजावे लागता. उदाहरणार्थ शेतकरी कष्टकरी वगैरे वर्गास जास्त चुचकारावे लागत नाही. बोलताना त्यांस अन्नदाता, देशविधाता वगैरे म्हटले तरी पुरे. त्यांना खरोखरीच फार

महत्व द्यावे असे नाही. पण धनाढ्य व्यापाऱ्यांची बाब वेगळी. त्यांना लाल गालिचाच हवा! पण दरबाराचे महत्व कमी न करता.. त्यांच्या नकळत.

प्रधानजी : होय महाराज! आम्ही त्व ता ता अंमलबजावणीबद्दल विचार करून आदेशतो महाराज..

महाराज : ते तुम्ही करालच. आम्हास खात्री आहे.. आज अत्यंत महत्वपूर्ण विषयांवर चर्चा झाली आहे. आता दरबार बरखास्तावा काय?

प्रधानजी : होय महाराज! नाही म्हणजे जशी आपली मर्जी महाराज!

महाराज : दरबार बरखास्त!

प्रधानजी : महाराजांचा विजय असो..

दरबारी : चक्रमादित्य महाराजांचा विजय असो! विजय असो! विजय असो!

# १०.

महाराज आज एखाद्या वकिलाच्या वेशात. पायघोळ काळा डगला. जुने न्यायाधीश घालायचे तसा विग. एका हातात भाजीवाले वापरतात तसा तराजू. त्यातील एका तागडीत गुलाबाची फुले. दुसऱ्या हातात हातोडी. डोळ्यावर न्यायदेवतेसारखी पट्टी, येता येता अडखळतात. कारण दिसत काही नाही. तराजूत हातोडी ठेवतात. ती तागडी झटकन खाली जाते. हातोडी उचलून हातात घेतात. हातोडा सांभाळत सांभाळत एका डोळ्यावरून पट्टी बाजूस सारतात. मग तराजू नाकाजवळ आणून दीर्घ वास घेतात.

दरबारी : राजाधिराज चक्रमादित्य महाराजांचा विजय असो..

आरती सुरू होते..

जय देव जयदेव तू देव कायदा
तूचि एक कायदा हा तुझा वायदा
जय देव जय देव

मनासी तुझिया येई बनविसी कायदा
अज्ञांना न कळे तयांचा फायदा

जय देव जयदेव

तुझिया मनीचे न जाणितो कोणी
विरोध करी कोणी त्यास हाणितो कोणी
जय देव जयदेव

राष्ट्रहित राष्ट्रभक्ती राष्ट्र-राष्ट्रही तूच
कायद्याविरोधी कोणी त्यांस लावसी बूच
जय देव जयदेव

कठोर तुझे नियम कठोर अंमलबजावणी
न चिठ्ठी न चपाटी न लागे खत खतावणी
जय देव जयदेव

अशा चक्रमपुरी राजा तू एक असा सक्त
भाग्यवंत आम्ही एक तू सांभाळिसी तख्त
जय देव जयदेव

कायदेभूषण होराभूषण पद्मभूषण विभीषण न्यायसम्राट चक्रधर चक्रवर्ती चक्रमपुर सम्राट चक्रमहृदय सम्राट चक्रमादित्य महाराजांचा त्रिलोकी त्रिखंडी त्रिशतकी त्रिवार विनय असो. विनायक असो. विद्याधर असो. विनिमय असो. विजय ही असो..

महाराज हातोडी आपटतात. मग तराजूतल्या फुलाचा वास घेऊन तो बाजूला ठेवत सिंहासनावर बसतात.

महाराज : अत्यंत सुयोग्य सुंदर सुविचारी..

प्रधानजी : सुमंगल सुरस सुमधुर..

महाराज : प्रधांजी.. सु शब्द पुरविल्याबद्दल धन्यवाद

प्रधानजी : कृपया असे बोलू नये महाराज. हे आमचे कर्तव्यच आहे. आणि आपली भाषा समिती हे अजोड अमोघ अद्वितीय अश्लाघ्य अविरत कार्य अखंड करत आहे..

महाराज : अ.. छान! अ शाबास! आम्हास आमचा आभिमान वाटतो. आपले राज्य आसेतुहिमाचल आमरण आजन्म सुरळीत आहे ना?

प्रधानजी : आर्थात महाराज! आपण आसताना ते तसेच आसले पाहिजे आसे आगदी आसन्नमरणावस्थेतील ही कोणी आदमी सांगेल.

महाराज : आनंद आहे! आणि आजचे आपले काव्य आतिशय आशयपूर्ण! आतिशय आशयघन!

प्रधानजी : आपली कृपा महाराज! आपल्या आंगचे गुणच आसे की काव्यास त्याचा आपसूक सुगंध येतो..

महाराज : आसो. राज्याची हालहवाल?

प्रधानजी : उत्तम. अत्युत्तम. महाराजांच्या नामाची आणि कार्य कर्तृत्वाची दुंदुभी तिन्ही लोकी त्रिखंडी तिन्ही त्रिकाळ त्रिवार दुमदुमत आहे. चक्रमपुरीसारखे कायद्याचे राज्य न कोठे असेल न कोठे होईल. महाराज चक्रमादित्य म्हणजेच कायदा.. महाराजांचे राज्य म्हणजेच कायद्याचे राज्य. महाराज म्हणतील तो कायदा. आणि कायद्याच्या राज्याचा महाराजांचा वायदा! त्यातच चक्रमपुरीवासियांचा आहे फायदा.

महाराज : होय! आम्ही कायद्याची बूच नव्हे बूज राखतो. आम्ही कायदे बनवतो..

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : त्यात आम्ही कडक कायद्यांसाठी मशहूर.

प्रधानजी : होय महाराज! एकदम कडक!

महाराज : पण आम्ही तसे नाही. कायदा सर्वांस सारखाच. फक्त सारेच जण सारखे नाहीत तर त्यास कायदा तरी काय करणार? सारी हाताचीच बोटे म्हणून अंगठी कोणी अंगठ्यात घालीत नाहीत. फक्त नावालाच तिला अंगठी म्हणतात.. तेव्हा सीमेवरील बंदुकीने शत्रुवध करणारा सैनिक नि कुणी उगाच कुणाचा खून पाडणारा खुनी, दोघे सारखेच कसे असतील? सुरक्षा महत्वाची. त्याप्रमाणे कायदा. सीमेवरील वा अंतर्गत सुरक्षा.. आमच्या प्रजेतील कित्येक प्रजाजन देशद्रोह्यांबद्दल असेच धोरण पत्करतात. सांभाळपुरात जसे झाले. आम्ही पाहात होतो. बारीक नजरेने. आम्ही त्यावर काही बोललो नसू. पण आम्हास कळते सारे. हे सगळे अंतर्गत सुरक्षेसाठी. मग लोकांनी नाही केले शब्दश: कायद्याचे पालन तरी त्यांचा

उद्देश महत्वाचा. अशा देशहित राष्ट्रप्रेमी जनांच्या कृत्यास केवळ कायद्याने शिक्षा द्यावी? का? न्यायालयीन कामकाज दीर्घ काळ चालते ते आमच्या प्रकृतीस मानवत नाही. आपल्या मनातील देशप्रेमाची ज्योत लोकांनी सदा चेतवत ठेवली की तिच्या आगीत काही देशद्रोही चोरचिलटे जळून खाक होणारच. अशा जळणाऱ्यांसाठी केवळ ते नशिबाने चक्रमपुरचे रहिवासी होते म्हणून कुणी चार अश्रू ढाळावेत? आणि आमच्या देशहितैषी राष्ट्रप्रेमी देशोद्धारी जनसामान्यांस, जे आमचे प्रतिनिधी आहेत, त्यांस कोणी कायदा दाखवावा? केवळ कायद्याची थेट अंमलबजावणी करून शिक्षाही आरोपीस त्यांनीच दिली म्हणून? नाही. तसे केल्यास आम्ही आमचे ध्येय विसरल्यासारखे होईल. आम्ही देशहितरक्षक. राष्ट्रहितैषी. त्यासाठी स्वत:स विचारी म्हणत राष्ट्रोद्धारात अडथळा आणणारी चार दोन अडगळ डोकी फुटली म्हणून आम्ही त्यांच्यासाठी रडत बसणारे नाही. देशासाठी त्यांनी इतके तरी करावयास हवेच! आणि शेवटी कायदा माणसासाठी आहे, माणूस कायद्यासाठी नाही.. आम्ही कायदे बनवतो. कडक बनवतो. त्याचे एक न एक एक अक्षर पाळण्यासाठी असले तरीही त्यामागील अर्थ समजून घेऊन वागतो आम्ही..

प्रधानजी : होय महाराज! म्हणूनच महाराज चक्रमपुरी कायद्याच्या राज्यासाठी प्रसिद्ध आहे. आणि त्याचे कारण म्हणजे महाराज आपणच.

महाराज : आम्ही न्यायासाठी मशहूर. कायद्यासाठी मशहूर. देशाबाहेर आमची प्रतिमा अशी न्यायप्रिय अशीच आहे आणि राहो. बाकी कायदा त्याचे

काम करील. ते करू द्यावे. हवे तिथे कायद्यास मानवी स्वरूप मात्र द्यावयास हवे. आम्ही जलनपुरच्या आंतरदेशीय विधी संमेलनात हेच प्रतिपादन केले. काही विधिनिषेध न बाळगता काही जण विधी संमेलनात निषेध करण्यास पोहोचले. पण आम्ही प्रतिपादन केले तो विषय, कायदा व माणूस यांचे अंतर्संबंध. आम्हास त्या संमेलनात कायदेभूषण म्हणून किताबही मिळाला.. त्याचबरोबर न्यायसम्राट ही पदवी देखील..

प्रधानजी : अर्थात महाराज. अभिनंदन महाराज! ही अभिमानाची बाब चक्रमपुरीच्या रस्त्यावरील नाक्यानाक्यावर फलक उभारून जनतेपर्यंत पोचवली आहे. आपल्या त्या किताबाची खबर आमच्यापर्यंत कालच पोहोचलेली महाराज. म्हणून तर आज आम्ही शब्दफुलांनी नि शब्दगंधी काव्यकुसुमांनी खास काव्य गुंफून घेतले. आता आपल्यावर अन्याय अन्याय म्हणून आक्रोशत आरोप करणाऱ्या विरोधकांची यातून तोंडे कायमची बंद होतील. आज जनता खूपच आनंदात आहे, तसे आदेशलोच आहोत आम्ही.

महाराज : शाबास! आम्ही आज प्रसन्न आहोत. सुन्न आणि खिन्न आहोत..

प्रधानजी : छिन्न विछिन्न महाराज..

महाराज : होय! ते पण आहोत. कायदेभूषण न्यायसम्राट आम्ही. आम्हास आमचाच अभिमान वाटतो. आम्ही आहोत म्हणून हे राज्य आहे.

प्रधानजी : होय महाराज! खरेय महाराज!

महाराज : आज आम्हास प्रगतीबद्दल अजून विचार करणे आहे. आंतरराज्यीय प्रसिद्धीनंतर आम्ही परग्रहावरील देशांतही प्रसिद्ध पावू असे नेत्रदीपक कार्य आम्हास करावयाचे आहे. तेव्हा..

प्रधानजी : त वरून तागडी महाराज.. दरबार बरखास्त?

महाराज : तुम्ही हुशार आणि चतुर आहात. प्रधांजी.. दरबार बरखास्त..

प्रधानजी : जशी दरख्वास्त महाराज.

दरबारी : महाराजांचा विजय असो..

# ११.

महाराज नेहमीच्या सुटाबुटात. आज डोक्यावर एक हॅट आहे. हाती बटमोगऱ्याचे फूल. शिपाई त्यावर अत्तर शिंपडतो. महाराज दीर्घ श्वास घेत आत येतात.

दरबारी :

राजाधिराज चक्रमादित्य महाराजांचा विजय असो.

आरती सुरू करतात :

जय जय दीनदयाळा कृपाकर महाराजा
तव नामाचा वाजे डंका जगभर हे राजा

जगद्धोराचा घेऊनी जीवनभर वसा
तू जगत्शर्यतीत धावशी जणू ससा
तव पासंगास पुरेल कोण कसा बसा
ऐसा विख्यात तू अलम दुनियेत असा
तव नामाचा म्हणून जगती गाजा अन वाजा
जय जय दीनदयाळा कृपाकर महाराजा..

चक्रमपुरीस प्रगतीपथी सत्वर तू नेले

बोटे तोंडे घालून बघती असे काय त्वा केले
कित्येक खुसपटी खुळचट मत्सरानीच मेले
त्याने न नुकसान.. सांगा कुणाचे काय गेले?
जनसामान्य चतुर म्हणती त्यांस तत्काळ जा जा
जय जय दीनदयाळा कृपाकर महाराजा..

ऐशा चक्रमपुरीचा अलम दुनियेत हेवा
जपतो नाम तुझेच दिनभर, तू अमुचा ठेवा
ईश्वरकृपा जाहली, अवतारसी तू जेव्हा
कडेलोट अधर्मी निमिषात करसी तू तेव्हा
साक्षात दंडवत अन प्रणिपात तुज माझा
जय जय दीनदयाळा कृपाकर महाराजा..

महाराजांचा विजय असो..

महाराज : केवळ एकवार विजय?

प्रधानजी : क्षमा असावी महाराज. आपला विजय तर तिन्ही त्रिकाळ आहेच आणि तो असावाच..

महाराज : आजचे काव्य बहारदार..नक्कीच कोणी पगारदार कवी नसावा..

प्रधानजी : होय महाराज! आपल्या पदरचे मानद कवि आणि लेखक हल्ली सतत लिखाणात मग्न असतात महाराज. पण आता सामान्य जनही राष्ट्रप्रेमाने

ओतप्रोत भरलेले लिखाण करू लागले आहेत. आपले प्रशिक्षित तर लिहित आहेतच..

महाराज : छान! चरणदासाने जाता जाता चांगलेच काम केले. त्याचा धरतीवरील कार्यभाग उरकला नि गेला बिचारा देवाघरी. पण गेला परी कीर्तीरूपी उरला चरणदास. राष्ट्रभक्तीरसपूर्ण काव्य. ऐकून रोम अन रोम उभा राहतो. रोमांच उभे राहतात!

प्रधानजी : होय महाराज.

महाराज : आम्हाला वाटतेय, आज आम्ही खूप आनंदात आहोत. खुशीत आहोत. पण आमच्या हाती हा बटमोगरा कसा ते विचारले नाहीत प्रधांजी?

प्रधानजी : होय महाराज! होय म्हणजे नाही, म्हणजे नाही विचारले महाराज. पण आता विचारू महाराज?

महाराज : हे विविधतेचे प्रतीक आहे प्रधांजी. आम्ही गुलाबच नव्हे नि मोगरा बटमोगराच नव्हे तर रानफुलांसही सन्मान देतो. आता निर्गंधी फुलांवर अत्तर फवारावे लागते. त्यास पवित्र करून घ्यावे लागते.. हा भाग वेगळा..

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : आम्हास वाटतेय की आमच्या वेगवेगळया समित्यांच्या प्रगतीचा आढावा घ्यायची वेळ आलीय. त्यामुळे आमची छाती अधिक अभिमानाने फुलून येईल. राष्ट्रोन्नती.. आमचे एकच ध्येय! ज्यासाठी आम्ही रात्रंदिवस सारे काही करित आहोत, त्यासाठीच आम्ही असे झटत आहोत. रात्रंदिन आम्हास हाच एक ध्यास..एकच प्यास. आमचा आचार.. एकच विचार..

विकास आणि प्रगती.. तिजविण नाही गती. सांगावे प्रधांजी. हेच सांगावे. यातच आम्हाला राज्याची हालहवाल समजून येईलच.

प्रधानजी : होय महाराज! वेगवेगळया समितींचे कार्य अगदी जोरदार सुरू आहे महाराज.

महाराज : सर्वप्रथम सर्वात महत्वाची.. इतिहास सुधार समिती. कारण चांगला इतिहासच वर्तमानात भविष्य घडवतो! वर्तमानात जगणे सोपे करायचे तर भूतकाळाचे भूत मानगुटीवर बसवलेच पाहिजे.

प्रधानजी : होय महाराज! इतिहासाचे अवघड ओझे सोपे करण्यासाठी शालेय इतिहासाचे सुलभीकरण करण्यात येत आहे महाराज. काही लढाया परकीयांच्या बढाया मारल्या सारख्या वर्णिल्या जात होत्या. त्यांचा मजकूर बदलण्यात येत आहे. कित्येक ऐतिहासिक सत्ये आजच्या कालानुरूप बदलल्यास समाजास त्याची मदत होईल अशी समितीची धारणा असून त्यानुसार बदल होत आहेत. इतिहास हा कालानुरूप बदलतो असे नवे धोरण अवलंबल्यानंतर 'सोयीनुसार इतिहास' हे अत्यंत प्रागतिक ऐतिहासिक पाऊल उचलले गेले आहे. इतिहास घडवणे शक्य नसेल तर तो बदलावा असे काही जण म्हणत असले तरी इतिहास पुस्तकांतून बदलून आपणच नवा इतिहास घडवत आहोत महाराज!

महाराज : वा! शाबास प्रधांजी!

प्रधानजी : असे ऐतिहासिक कार्य करून महाराज इतिहासात अमर होतील..

महाराज : अमर? आम्ही अजून जिवंत आहोत प्रधांजी! गेलेला माणूसच अमर होतो आपल्याकडे! एखाद्या जिवंतास अमरत्वाची काय ती किंमत?

प्रधानजी : माफी असावी महाराज. आपण म्हणता ते सत्यच असते. कीर्तीरूपी उरण्यास मरणे आवश्यक!

महाराज : असू द्यावे प्रधांजी. खरेतर आम्हास त्या मर्कट स्पर्धेबद्दल उत्सुकता आहे..

प्रधानजी : आज्ञा महाराज. राष्ट्र निर्माण समितीने कपिवराची निवड केली आहे. लवकरच आपली मोहोर लागली की ही बक्षिसे वाटली जातील. त्यानिमित्ताने हजारो माकडे स्पर्धेत होती..

महाराज : माकडे?

प्रधानजी : क्षमा असावी महाराज. हजारो नागरिक स्पर्धेत होते. कित्येकांनी प्रत्यक्ष कान नाक डोळा तोंड यावर खरोखरीची चिकटपट्टी लावलेली. त्यातील कित्येकांनी यापुढेही त्या पट्ट्या तशाच ठेवण्याचा प्रण केला आहे महाराज. आणखी एक निरिक्षण असे आहे महाराज, कपिवर स्पर्धेत पुढे असणारेच सुखी नागरिक स्पर्धेत आघाडीवर आहेत महाराज!

महाराज : खरेच असणार ते! आणि आमचे नागरिक सुखी व्हावेत म्हणून आमची सारी मळमळ. नव्हे तळमळ.

प्रधानजी : होय महाराज! एक एक नागरिक असा सुखी झाला की एकूणच राष्ट्र सुखी व्हायला कितीसा वेळ लागणार! राष्ट्रप्रेम उपज निपज आणि खपज समिती अत्यंत जलद गतीने काम करत आहे. कित्येक गुंडगिरीसाठी बदनाम गुन्हेगारही राष्ट्रप्रेमाने भारित होऊन कामाला लागले आहेत.

महाराज : वा! आम्हाला आमचा अभिमान वाटतो!

प्रधानजी : त्याशिवाय महाराज, पुनरूज्जीवनाचे काम अत्यंत वेगाने सुरू आहे. आपल्या पुर्वजांच्या वेळच्या चालीरीती व प्रथा परंपरांचे मोल जाणून त्यानुसार नागरिकांना त्यांचा अभिमान वाटणे गरजेचे आहे याबद्दल पुनरूज्जीवन समिती मोलाचे काम करत आहे. इतिहास सुधार समिती व पुनरूज्जीवन समिती दोन्ही एकाच वेळी आपले काम संलग्नपणेही करत आहेत. आपले नागरिक सांप्रतकाळात असले तरी भूतकालीन स्मृतींत रममाण होत भविष्याची स्वप्ने रंगवत आहेत महाराज!

महाराज : आम्हाला आमचाच अभिमान वाटल्याशिवाय राहात नाही.

प्रधानजी : होय महाराज! सत्य आहे महाराज.

महाराज : एकूणच राष्ट्रनिर्माण कार्य जोरदार सुरू आहे.. आम्ही खूश आहोत.

प्रधानजी : आपण असताना काय अशक्य आहे महाराज? भाषा सुधार समिती नवनवीन शब्द शोधून काढत आहे. कवि लेखक निर्माण समितीच्या कार्याचे प्रतिबिंब तर दैनंदिन दरबाराच्या कारभारात दिसत असतेच.

महाराज : हे कार्य महत्वपूर्ण! शब्दसेवा हीच राष्ट्रसेवा!

प्रधानजी : मौन सर्वार्थ स्थितप्रज्ञ समितीने आपले कामकाज सुरू केले आहे महाराज. शाळाशाळांतून हाताची घडी तोंडावर बोट अशी शिकवण देणारा शिक्षकवर्ग या समितीत मोठ्या प्रमाणात असावा आणि 'कुणीही यावे टपली मारून जावे, रडू नये, हलू नये, गुपचुप बसावे' ह्या बालखेळातून आदर्श नागरिक घडवावेत. अगदी शाळकरी वयापासूनच ही क्षमता

विकसित केली तर जनसामान्य सुखसागरात डुंबतील असे समितीस वाटते. त्यानुसार अंमलबजावणी त्व ता ता सुरू केली आहे महाराज.

महाराज : छान! आम्हास आमचाच अभिमान वाटतो!

शिपाई आत येतो. प्रधानजींच्या हाती एक पत्र देतो. प्रधानजी उघडून वाचतात..

प्रधानजी : अत्यंत आनंद आणि अभिमानाची बाब अशी बातमी आहे महाराज. शेजारील काळनगर बुद्रुक येथील 'त्रिखंड जनतागामी राजा' सर्वेक्षणात चक्रमपुरीचे महाराज राजाधिराज चक्रमादित्य महाराज यांची सर्वोत्तम जनतागामी राजा म्हणून निवड झाली आहे. त्याचप्रमाणे सर्वोत्तम जनप्रिय आणि सर्वोत्तम लोकप्रिय राजा म्हणूनही महाराजांचा सन्मान करण्यात आला आहे.

महाराज : काळनगर बुद्रुक म्हणजे तेच..

प्रधानजी : होय महाराज. गतवर्षी महाराजांची बदनामी आपल्याच राज्यातील देशद्रोह्यांस हाती धरून करणारे तेच राज्य. आपल्या कृतिशील निषेधानंतर आता त्यांना महाराजांची खरी किंमत कळली असावी. अखिल दुनियेस आदर्श वाटावा असे आपले चक्रमपुरी राज्य केवळ चक्रमादित्य महाराजांच्या पुरोगामी प्रगती आणि विकासशील नेतृत्वामुळेच इतर अनेक राज्यांस मार्गदर्शक व पथदर्शी ठरावे असा संदेश त्याबरोबर पाठवण्यात आला आहे..

महाराज : प्रधांजी..

प्रधानजी : त वरून तटबंदी महाराज.. त्व ता ता अंमलबजावणी होईल..

महाराज : कसली?

प्रधानजी : अर्थातच ही आनंददायी अभिमानास्पद व गर्वशाली बातमी अखंड चक्रमपुरीत रस्तोरस्ती झळकेल. महाराज त्या फलकाफलकावरील छायाचित्रांतून जनतेस दर्शन तर देतीलच, त्याचबरोबर स्फूर्तीही देतील. तसेच महाराजांची करडी नजरही जनतेवर राहिल. त्व ता ता असे फलक झळकतील महाराज..

महाराज : आपण प्रधांजी असताना ते त्व ता ता होईलच. आमची खात्री आहे. आम्ही राष्ट्रोद्धाराच्या कामी वाहून घेतले आणि पुढे ही घेऊ. घेत राहू. ईश्वरच आमच्याकडून हे दैवी कार्य करवून घेत आहे.

प्रधानजी : होय महाराज! जनतेसही तेच वाटते व पटते महाराज!

महाराज : आज अत्यंत शुभ दिवस आहे..

प्रधानजी : होय महाराज! पवित्र आणि मंगलमय देखील महाराज.

महाराज : आम्हास वाटते आज इथेच दरबार बरखास्त करावा. ह्या आनंददायी बातमीने हेचि फळ मम तपाला असे वाटत आहे. आम्ही कृतार्थ आहोत.. आता विशेष काही करण्याची गरज नसावी. आम्ही राज्याची घडी लावून दिली आहेच.

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : पण अखंड रहावे सावधान प्रधांजी. जोवर माणसाच्या मेंदूत येणाऱ्या विचारांची सूचना मिळणारे तंत्रज्ञान विकसित होत नाही तोवर अखंड रहावे सावधान!

प्रधानजी : होय महाराज!


महाराज : दरबार बरखास्त!

प्रधानजी आणि दरबारी : महाराजांचा विजय असो!

----समाप्त----

डॉ. नितीन मोरे यांची ४०+२ प्रकाशित पुस्तके


यांच्या कव्हरवर क्लिक करताच (नेट असल्यास) पुस्तक उघडेल.





























डॉ. नितीन मोरे
Version 2.0.2.0





डॉ. नितीन मोरे
चक्रमादित्याचा दरबार



चक्रमादित्याचा दरबार


डॉ. नितीन मोरे
व्यक्ती आणि कथा



डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे










राग दरबारी



डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच



आधुनिक कहाण्या





डॉ. नितीन मोरे
भ्रष्टाचार






डॉ. नितीन मोरे
घरात



डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
सांगतो ऐका



डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे






डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक : अंजना लगस (8208834250)
कानगोष्टी


डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते



डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक व तज्ञ : अंजना लगस



डॉ. नितीन मोरे
'इक्का'गाईच्या कविता


डॉ. नितीन मोरे
रोमिओची परी कथा


डॉ. नितीन मोरे
ऐसी अक्षरे


Jackson!


डॉ. नितीन मोरे
व्यक्ती आणि कथा २


सुलट
डॉ. नितीन मोरे

# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे पंधरावे वर्ष

# डॉ. नितीन मोरे यांचे हे त्रेचाळीसावे पुस्तक.

डॉ. नितीन मोरे एक यशस्वी श्वसनरोगतज्ञ आहेत आणि एक उत्साही लेखकही. त्यांच्या लेखनात एक टवटवी असते. त्यांचा विनोद कोणाच्या व्यंगावर आधारित नसतो, स्तर सोडत नाही. समाजातील अनिष्ट विसंगतीवर ते आपल्या विनोदातून नेमकं बोट ठेवतात. समझदार वाचकांना त्यांचा इशारा काफ़ी असतो. त्यामुळे त्यांच्या नर्म विनोदाचा एक फ़ॅनवर्ग निर्माण झाला आहे. ते फ़क्त विनोदी साहित्य नव्हे तर निरनिराळ्या प्रकारचे लेखन लिहीतात.  त्यांनी गेली अनेक वर्षे आपले लेखन निरंतर चालू ठेवले आहे. त्यांना प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण त्यांना आपली पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेणारे आणि प्रकाशनप्रक्रिया सुलभ असणारे प्रकाशन हवे होते. त्यांनी ई साहित्यची निवड केली.

डॉ. नितीन मोरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्य-च्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१३), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (४३), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू

शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(३७), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(२२), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(५) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(६), श्याम कुलकर्णी(५), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(३), मंगेश चौधरी, बंकटलाल जाजू(३) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं "इ"यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।

esahity@gmail.com

www.esahity.com

9869674820 (for free books on whatsapp)